अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - १३ / २००८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १६ -०६ -२००८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

सभा सुचना क्रमांक १३ , दिनांक २५ - ०६- २००८.

प्रति,

सन्मा.श्री. / श्रीमती.......................................................

सदस्य / सदस्या, प्रभाग क्रमांक ...............

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २५-०६-२००८ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.
३. दि.१८-१२-२००७ ,दि.२७-१२-२००७,
दि.२०-०२-२००८चे इतिवृत्त.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सभा क्रमांक १३ दिनांक २५ - ०६- २००८ रोजी दु.१.०० वां होणा-या सभेची विषय पत्रिका.

**-- *--**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १ | दि.१८-१२-२००७, दि.२७-१२-२००७ व दि.२०-०२-२००८ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव. |
| ३ | स्नेहालय व रूरल डेव्हलपमेंट रिसर्च ॲण्ड कम्युनिकेशन या संस्थेकरीता महानगरपालिकेचे मैनाबाई देशपांडे मुलींची शाळा, गांधी मैदान, मैदान आड ही जागा मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | अहमदनगर महानगरपालिकेतर्फे कायम विना अनुदान तत्वावर दोन माध्यमिक शाळा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर. |
| ५ | बुरूडगांव रोडवरील नगर रचना योजना, अहमदनगर क्र.३ अं.भु.क्र.९२ या जागेमध्ये बी.ओ.टी.अथवा अन्य पध्दतीने भाजी मंडईसह व्यापारी संकुल विकसित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर. |
| ६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर शास्त्रोक्त प्रक्रीया करून खत निर्मिती, उर्जा निर्मिती, बायो गॅस निर्मिती प्रकल्प उभारणेबाबत मा.स्थायी समितीचा ठराव, अटीं व शर्तीसह ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव. |
| ७ | घरोघरी कचरा संकलन करणेसाठी घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी नव्याने उपलब्ध होणा-या कचरा वाहनांसाठी वाहन चालकांच्या नेमणुकी बाबत ऑफिस रिपोर्ट (कंत्राटी पध्दतीने) |
| ८ | अहमदनगर प्रारूप विकास योजना ( वाढीव हद्द ) - महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रारूप विकास योजना (वा.ह.) प्रसिध्द करणे व कलम ३० अन्वये मा.शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे तसेच कलम २१, २८ व ३० अन्वये आवश्यक असलेल्या मुदतवाढी मंजुर करणेबाबत. |
| ९ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १६-०६-२००८.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : २५-०६-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** दिनांक १८-१२-२००७, दिनांक २७-१२-२००७ व २०-०२-२००८ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

-- ** --

**प्रस्तावाचा मजकुर :** मागील दिनांक १८-१२-२००७, दिनांक २७-१२-२००७ व दि.२०-०२-२००८ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविले.

-- * --

**चर्चा :**

मा.श्री.दिप चव्हाण :- सिध्दार्थ नगर येथील अण्णाभाउ साठे वसाहतीची मा.आयुक्त सो, यांनी पहाणी केली आहे. याठिकाणचे बरेचशे प्रश्न मी यापुर्वीच मांडलेले आहेत. व माझ्या भागातील प्रश्न सुटण्याकरीता मी उपोषणाची नोटीसही प्रशासनाला दिली होती. तथापि प्रशासनाने माझ्या पत्राची दखलही घेतलेली नाही व मला त्याबाबत साधे उत्तरही पाठविलेले नाही. माझ्या पत्रावरुन नगरसेवकांनी पत्रे पाठविली याचे भान ठेवुन उत्तरे द्यावयास पाहिजे.

यावर उपमहापौर श्री.सुळ यांनी मा.नगरसेवकांची पत्रे आल्याबरोबर त्यास प्रशासनाने खुलासा करणे आवश्यक आहे असे सुचविले.

सभागृहामध्ये मा.सदस्य बोलण्यास उभे राहिले सर्वश्री.पाउलबुधे, दिप चव्हाण, अनंत जोशी, भगवान फुलसौंदर, नरेंद्र कुलकर्णी.

मा.महापौर सदर भागामध्ये डी.पी.रोड आहे. सदर भागातील शौचालय बांधकाम पाडलेच कसे गेले व कोणी पाडावयास सांगितले हा प्रश्न आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- सदरचा विषय शौचालय पाडण्याचा नाही तर सदर ठिकाणचे बांधकाम करण्या बाबतचा विषय आहे.

त्यावर मा.महापौर यांनी सागितले की, आयुक्त सो, यांनी सदर बाबत पहाणी केलेली आहेच तेच योग्य तो मार्ग काढु शकतील.

मा.श्री.गिरवले कैलास :- अशाच प्रकारे कोठी येथील कामाचा शुभारंभ झालेला होता. ते कामही चालू नाही.

मागील दिनांक १८/१२/२००७ च्या कार्यवृत्तावर चर्चा चालू झाली असता

१. शिक्षण मंडळ सदस्यांना मानधन भत्ता देणे बाबत

मा.श्री.सुळ दिपक उपमहापौर :- सदरचा विषय मागील वेळेस स्थगित ठेवणेंत आला होता. याबाबत उपायुक्त यांनी खुलासा करावा असे सुचविले.

यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, ब-याच महानगरपालिकेतुन या बाबतची माहिती मागविण्यांत आलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आपल्या शिक्षण मंडळाच्या सदस्यांना मानधन देत नाही. औरंगाबाद येथे शिक्षण मंडळ अस्तित्वात नाही. तसेच सांगली मिरज कुपवाड या महानगरपालिकेतही मानधन दिले जात नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- मागील वेळी हा विषय तहकुब होता.

महापौर :- मा.सदस्यांनी याबाबत आपले मत द्यावे. सदर विषय मांडायचा किंवा ठेवायचा.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सदर विषय घेण्यांत यावा असे सुचविले.

मा.श्री.दिप चव्हाण :- मागील सभेतील प्रस्ताव क्रमांक ७ श्रीखंडे कंन्सल्टंट यांच्या प्लॅनिंग बाबत कारवाई कोठपर्यंत केलेली आहे. बजेट केलेले आहे काय. अमरधाम चौक ते दिल्लीगेट ते पत्रकार वसाहत हा रस्ता पावणे दोन ते दोन कोटी रुपयांपर्यंत होवु शकतो. आता अंदाजपत्रक खुपच वाढलेले आहे.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, पुर्वी सदरचा रस्ता हा १ किलोमीटर लांबीचा धरलेला होता. त्यामध्ये हा रस्ता आता दोन किलोमीटर लांबीचा धरण्यांत आलेला आहे. व नविन संकल्पनेनुसार रस्ता चांगल्या प्रकारे होत असल्यामुळे या रस्त्याचे बजेट वाढलेले आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- याबाबतचे टेंडर तीन वेळा निघालेले आहे.

मा.महापौर यांनी रस्त्याबाबत परत खुलासाकेला की, बँकांकडुन अर्थसहाय्य घेवुन रस्ता करण्यांबाबत चर्चा चालू आहे. कमीत कमी व्याज दराने ज्या बँका कर्ज उपलब्ध करुन देतील त्यांच्याकडुन कर्ज घेण्यांत येईल ५ टक्के दराने कर्ज मिळाल्यास हरकत नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :-दलित वस्तीतील कामाचे रनिंग बिल देता येत नाही असे माझे मत आहे. (दलित वस्ती नागरी सुधारणा)

यावर प्रशासनाने कामाचे रनिंगबिल देण्यांत येते असा खुलासा केला.

मा.श्री.अशोक कानडे :- दि.१८/१२/२००७ च्या विषय क्रमांक २ मधील एकात्मीक घरकुल योजनेची मध्ये चर्चा केली.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, हडको केंद्रशासनाचे योजनेतुन महानगरपालिका करण्यांस तयार आहे.

मा.श्री.उडाणशिवे :- अ घोषित झोपडपट्या घोषित करणे बाबत महानगरपालिकेने काय कार्यवाही केली. याबाबतचा खुलासा देण्यात यावा अशी मागणी केली.

यावर श्री.धोंगडे नगररचनाकार यांनी खुलासा केला की, शासनाकडे झोपडपट्या घोषित करणे बाबत प्रस्ताव पाठविणेंत आलेला आहे. व त्यावर मा.महापौर यांनी पुन्हा शासनास स्मरणपत्र देण्यांत यावे असे आदेश दिले. व अशा प्रकारे झोपडपट्या घोषित झाल्यानंतर व जाहीर झाल्यानंतर कार्यवाही करता येईल.

मा.श्री.उडाणशिवे : यावर शासनास पुन्हा स्मरण पत्र पाठविण्यांत यावे असे सांगितले.

मा.श्री.कैलास गिरवले :- कनिष्ठ अभियंत्याच्या खुल्या जागेतील विशेष भरती बाबत श्री.सातपुते यांनी कोर्टाकडुन स्थगिती आदेश मिळविला आहे. याबाबत महानगरपालिकेची काय भुमिका आहे याबाबतचा खुलासाकरावा असे सुचविले.

यावर उपायुक्त यांनी याबाबतचा खुलासा केला.

मा.श्री.अभय आगरकर :- भरतीचे वेळी कॅवेट का दाखल करुन घेतले नाही. आस्थापना खर्च वाढतो आहे या मुद्यावर महानगरपालिकेच्या शेड्युल वरील सॅक्शन पोस्ट वाया घालवणार आहेत काय. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, दिनांक १ ऑगस्ट २००८ पासुन महाराष्ट्र शासनाचा जकात कर रद्द होणार असल्यामुळे व सदरची पदे ही बहुतांशी जकात विभागाकडील असल्याने याबाबत महाराष्ट्र शासनाकडुन मार्गदर्शन मागविण्यांत येईल व तद्नंतर सदर भरती बाबतची स्थगिती उठविण्यांत येईल.

मा.श्री.अशोक कानडे :- अनुशेष भरती बाबत मे.महाराष्ट्र शासनाकडील गाईड लाईन्स आहेत.

मा.श्री.अभय आगरकर :- अनुशेष भरती बाबत मा.आयुक्त यांनी केलेला खुलासा आम्हांस मान्य नाही. यामुळे आपण सामाजिक न्याय तत्वासच तिलांजली देत आहात. याबाबत

मागील आयुक्त मा.पवार आणि आपल्या भुमिका वेगवेगळया आहेत याबाबतही आपण खुलासा करावा. कुठल्याही घटकावर अन्याय होणार नाही हे पहावे व मा.आयुक्त यांनी याबाबत जो निर्णय घेतला आहे तो मागे घ्यावा. अनुशेष भरती बाबत मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस वेळोवेळी बैठका होत असतात व नेहमी चर्चाही होत असते. व तेथे अनुशेष भरण्याबाबत प्रोसिडींगही असते. सदरचे प्रोसिडींग सादर करावे सदर प्रोसिडींग आपण गुंडाळून ठेवणारआहात काय.

मा.श्री.कानडे अशोक : मा.आगरकर यांनी योग्य ती सूचना मांडलेली आहे. त्यामुळे मा.आयुक्त यांनी भरती बाबत स्थगिती दिली आहे ती त्यांनी मागे घ्यावी कारण अनुशेष हा विषय आणि एकुण खर्च हे विषय वेगवेगळे आहेत. यावर आयुक्त यांनी पुनःश्च खुलासा केला की, जकात बंद झाल्यावरही ही पदे रहाणार आहेत त्यामुळे त्याबाबत विचार करावा.

मा.श्री.अभय आगरकर :- मागील इंजिनिअर भरती बाबत सभागृहामध्ये जी चर्चा झाली ती कॅसेट वरील चर्चा पुसून टाकण्यात आली आहे. मी याबाबत सदरची कॅसेट देण्याबाबत मागणी केली होती ती कॅसेट मला मिळालेली नाही. अशा गोष्टीबाबत अधिकारी यांनी जबाबदारीने वागावे.

मा.श्री.कानडे अशोक :- अशा कॅसेट बाबत कारवाई झाली पाहीजे. या सर्व केलेल्या मागण्यांबाबत चौकशी करावी.

मा.श्री.कैलास गिरवले :- ही गंभीर स्वरुपाची घटना झालेली आहे. याबाबत काय काय कार्यवाही करण्यांत आली आहे याची तपासणी करण्यात यावी. यावर मा.महापौर यांनी चौकशी करावी व महासभेत अहवाल आला पाहिजे असे सांगितले. तसेच अनुशेष भरती होणे आवश्यक आहे. या बाबत आयुक्त यांनी १५ दिवसांत नियमानुसार मा.शासनाचे मार्गदर्शन घेण्यात येईल असे सांगितले.

मा.श्री.कैलास गिरवले :- तालिम मास्तर बाबतचा विषय उपस्थित करतांना सांगितले की, ते कर्मचारी तालमीत रहात नाहीत व फुकटचा पगार खातात. गार्डन विभागातील अनेक कर्मचारी इतर विभागात काम करीत आहेत. संबंधित अधिकारी हे कर्मचा-यांना पाठीशी घालतात.

मा.श्री.सुळ उपमहापौर : गार्डन विभागातील सर्व कर्मचारी हे बांधकाम विभागाचे अंडर देण्यांत यावे.

मा.श्री.अभय आगरकर : मागील प्रोसिडींग कायम करण्याकरीता आज जवळ जवळ ६ महिन्यानंतर सभेपुढे येत आहे. यापुढील काळात किमान १ महिन्यालगतच्या सभेपुढे कार्यवृत्तांत कायम करण्यांस घेण्यांत यावा. तसेच पर्यावरण दिन साजरा करणे साठी जो खर्च झालेला आहे. याबाबत काही दखल घेतली आहे किंवा नाही. पर्यावरणाचा खर्च कागदोपत्री दाखविला गेला आहे वस्तुतः झालेला नाही. महानगरपालिके मार्फत खाजगी करणातुन कुत्र्यांचे निर्बिजीकरण होत आहे यात मोठया प्रमाणावर आर्थिक घोटाळा होत आहे. त्याबाबत पायबंध घालणार किंवा नाही.

मा.महापौर :- सर्व अधिकारी यांना सूचना दिल्या की, महासभेची ज्या ज्या वेळी मिटींग असेल व सभेपुढे जे जे विषय ठेवले असतील त्यात आप-आपल्या खात्याकडील अद्यावत माहिती घेवुनच सभेपुढे यावे. व वरील प्रकरणा बाबत उपायुक्त श्री.जावळे यांची चौकशी समिती नेमण्यांत येवुन व माहितीची चौकशी करुन पुढील सभेला माहिती द्यावी किंवा संबंधित सभासदांना माहिती द्यावी असे सांगितले व गार्डन विभागाकडील सर्व कर्मचारी बांधकाम विभागाच्या अंतर्गत वर्ग करावे असे सुचविले. यावर आयुक्त यांनी पर्यावरण अहवालाबाबत चौकशी उपायुक्त व मुख्यलेखापरिक्षक यांनी करुन १५ दिवसांत अहवाल सादर करावा असे सांगितले.

मा.महापौर :- महासभेपुढे घेतलेल्या सर्व निर्णयाची अंमलबजावणी झाली किंवा नाही याची पहाणी करुन वेळोवेळी अहवाल सादर करीत जावा.

मा.श्री.अभय आगरकर :- दि.१८/१२/२००७ च्या सभेचे कार्यवृत्त कायम करीत असतांना मी बजेटच्या विषया बाबत बजेट मॉनिटरींग कमिटी स्थापन केली पाहिजे असे सुचविलेले होते. त्यामुळे निरनिराळी कामे प्रस्तावित करतांना संबंधित किती खर्च झाला याचा रिव्ह्यु घेता येत नाही. किमान अधिकारी पातळीवर तरी अशा प्रकारे रिव्ह्यु घेण्यांत यावा. २ ते ३ महिन्यापुर्वीच मी या बाबत सूचना केलेली होती.

माळीवाडा येथे पुर्वी भाजी मार्केट होते तथापि भाजी विक्रेत्या करीता जागा राहिलेली नाही. सध्याचे गॅरेज संबंधित जागेस पर्याय म्हणुन घेण्यात यावे. भाजी मार्केट साठी व्यवस्था करावी. खोकरनाला अंदाजपत्रका बाबत नोंद करुन घ्यावी.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, नालेगांव गाडगीळ पटांगण येथील मोकळया जागेचा वापर होत नाही व सदर ठिकाणी भाजी मार्केट शक्य आहे का ? खुली जागा वापरास हरकत नाही.

यावर नगररचनाकार यांनी खुलासा केला की, सदर जागा ही खेळाच्या मैदानाकरीता वापरात आहे.

मा.श्री.वाकळे :- सावेडी येथील मोकळया जागे बाबत काय कार्यवाही करण्यांत आली याची माहिती देण्यात यावी.

मा.श्री.अनंत जोशी :- मागील तीन सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास ठेवण्यात आलेले आहे. आम्ही वेळोवेळी प्रश्न कोणास विचारावे गेल्या दीड वर्षात प्रश्नांची उत्तरे नाहीत. बांधकाम आरोग्य विभागाकडुन उत्तरे मिळत नाहीत. मा.महापौर यांनी आदेश देवुनही त्यांचे आदेशाची पायमल्ली होत असेल तर आम्ही कुठल्या सभेत प्रश्न विचारायचे आहेत. व प्रश्नउत्तरे दिली नाहीत याबाबत अधिका-यांना खुलासा विचारणार किंवानाही याचा खुलासा करावा.

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- महानगरपालिकेने उपविभागीय कार्यालये कार्यरत केली आहेत. तथापि या उपकार्यालयामध्ये आरोग्य करवसुली व इतर कर्मचारी उपस्थित नाहीत.

यावर मा.महापौर यांनी झोन कार्यालयामध्ये कर्मचा-यांची व सक्षम अधिका-यांची नेमणूक करण्यांत यावी असे सांगितले.

मा.श्री.दिप चव्हाण :- दि.२७/१२/२००७ चे सभेमधील विषय क्रमांक ७ बाबत कमिटी नेमण्यात आली होती याबाबत अहवाल आला आहे काय अशी विचारणा केली.

मा.श्री.सुनिल कोतकर :- क्रीडा संकुल उभारणे बाबत बजेट मध्ये विषय समाविष्ट करावा. त्याबाबत स्वतंत्र पत्र देण्यांत येईल असे सांगितले.

मा.श्री.अशोक कानडे :- दलित वस्त्यांचे कामकाजा बाबत झालेल्या रनिंग बिले देण्यांत आली आहेत याबाबत शहर अभियंता यांनी खुलासा करावा अशी मागणी केली.

याबाबत मा.महापौर यांनी जी.आर.नुसार अशी रनिंग बिले देता येतात असा खुलासा केला.

--*--

**ठराव :** दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ता मध्ये पुढील प्रमाणे दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करणेस ही सभा मान्यता देत आहे.

महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय विषयावर आयोजित करण्यात आलेल्या दिनांक २०-०२-२००८ च्या मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १ (१६) मध्ये घेतलेली नोंद पुढील प्रमाणे -

" मा.श्री. सुनिल रा. कोतकर, नगरसेवक यांचे पत्राची हे सभागृह नोंद घेत असून केडगांव येथे जीम ची इमारत बांधणे कार्यवाही सुरू असून मार्गदर्शक कोच नेमणे आवश्यक आहे याबाबत आस्थापना सुचीवर स्त्री व पुरूष कोच नेमणेकरिता सदरचे नविन पद निर्माण करणेची प्रक्रीया हाती घेणे आवश्यक आहे. मा.शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविणे त्यास मंजूरी मिळविणे यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. याकरिता तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक करून सदर ठिकाणी महिला कोच तसेच पुरूष जिमसाठी पुरूष कोच मार्गदर्शन करणेकामी उपलब्ध करून देणेत यावा. व महानगरपालिकेचे स्वतःचे कुस्ती संकूल उभारावे त्यासाठी येणा-या खर्चासाठी अंदाजपत्रकात आवश्यक तरतुद करणेत यावी. खर्च मंजूर. " असे नमुद आहे.

खालील प्रमाणे मसुदा ठरावामध्ये समाविष्ट करावा

" महानगरपालिकेचे स्वतःचे कुस्ती संकुल केडगांव येथे सर्व्हे नंबर ४२२ , मोतीबागनगर येथील ओपनस्पेस मध्ये उभारण्यात यावे. सदरच्या कामास व खर्चास मंजुरी देण्यात येत आहे. त्यासाठी येणा-या खर्चासाठी अंदाजपत्रकात आवश्यक तरतुद करणेत यावी. खर्च मंजुर तसेच याबाबत शहरातील व परिसरातील नागरिकांच्या वारंवार होणा-या मागणीस प्राधान्य देण्यात यावे. सदरचे काम प्रत्यक्षरित्या सुरू व्हावे याकरीता सदर कामाच्या निविदा मागविण्यास देखिल मंजुरी देण्यांत येत आहे. "

याप्रमाणे दुरूस्तीसह सर्व इतिवृत्त कायम करणेत यावे.

सुचक : मा.श्री.सुनिल कोतकर

अनुमोदक : मा.श्री.संजय लोंढे

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-xxx
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : २५-०६-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : दुखवटयाचे प्रस्ताव

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर :

-- * --

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दिनांक : २५-०६-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** स्नेहालय व रूरल डेव्हलपमेंट रिसर्च ॲण्ड कम्युनिकेशन या संस्थेकरीता महानगरपालिकेचे मैनाबाई देशपांडे मुलींची शाळा, गांधी मैदान, मैदान आड ही जागा मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

**प्रस्तावाचा मजकुर :** अहमदनगर शहराच्या जून्या गांवठाण हद्दीत मैदान आड परिसरात सि.स.नं.५५५३ ही महानगरपालिकेच्या मालकीची ६६.९० चौ.की. क्षेत्राची जागा असुन या जागेवर सुमारे ७० वर्षापुर्वीची प्राथमिक शाळेची इमारत असुन या इमारतीत सौ.मैनाबाई देशपांडे प्राथमिक शाळा (शाळा क्र.६) या नावाने तत्कालीन अहमदनगर महानगरपालिकेची प्राथमिक शाळा सुरु होती. तथापि या इमारतीचा शाळेसाठी वापर गेल्या अनेक वर्षापासुन बंद असुन या इमारतीची काही ठिकाणी पडझड झालेली आहे.

स्नेहालय अहमदनगर व रुरल डेव्हलपमेंट रिसर्च ॲण्ड कम्युनिकेशन सेंटर अहमदनगर या दोन सामाजिक संस्था शहरात मोलाचे सामाजिक कार्य करीत असुन या संस्थे मार्फत अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. या सुपरिचित संस्थेने महानगरपालिकेच्या शाळेत शिकणा-या गरीब व गरजू विद्यार्थ्यांकरीता संगणकीय प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेस दिलेला आहे. हा प्रकल्प अहमदनगर महानगरपालिका, स्नेहालय अहमदनगर व रुरल डेव्हलपमेंट रिसर्च ॲण्ड कम्युनिकेशन सेंटर अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्याचा प्रस्ताव संस्थे मार्फत सादर करण्यात आलेला आहे. या प्रकल्पाकरीता अहमदनगर महानगरपालिकेने उपरोक्त जागा उपलब्ध करुन द्यावयाची आहे. व उर्वरीत सर्व खर्च (इमारतीच्या दुरुस्तीसह) उदा. संगणक, फर्नीचर, शिक्षकांचा मासिक पगार इत्यादी सर्व खर्च या उभय संस्था करणार आहेत. उपरोक्त जागेचे मालकी हक्क महानगरपालीकेच्याच नावावर राहतील. या अटीस अधिन राहुन ही शाळा / इमारत उपरोक्त प्रस्ताव राबविण्यास मिळावी अशी मागणी संस्थेने केली आहे.

या प्रकल्पाची निश्चित माहिती समजावुन घेण्यासाठी मा.आयुक्त यांनी दिनांक १८/१२/२००७ रोजी उभय संस्थेच्या पदाधिका-यांशी चर्चा केली. या चर्चेच्या वेळी नगररचनाकार अहमदनगर महानगरपालिका उपस्थित होते. या चर्चेत संस्थेच्या पदाधिका-यांनी प्रस्तावांची सविस्तर माहिती मा.आयुक्त यांना दिली. या चर्चेत खालील मुद्दे स्पष्ट झाले.

१. अहमदनगर शहराच्या मंजुर विकास योजनेत विषयांकित जागा विद्यमान प्राथमिक शाळा म्हणजेच शैक्षणिक वापरासाठी दर्शविलेली आहे. संस्थेचा प्रस्तावित वापर देखील शैक्षणिक स्वरुपाचा असुन महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठीच असल्याचे दिसुन आले. त्याप्रमाणे हा प्रकल्प राबविण्यास मंजुर विकास योजनेच्या दृष्टीकोनातुन कोणतीही हरकत दिसुन येत नाही.
२. इमारत फार जूनी असुन काही ठिकाणी या इमारतीची पडझड झालेली आहे. ही वस्तुथिती असली तरी या इमारतीची दुरुस्ती करुन ही इमारत आणखी पंधरा ते वीस वर्षे वापरता येणे शक्य आहे. असे प्रत्यक्ष स्थळ पाहणीत दिसुन येते. ही वस्तुस्थिती विचारात घेता या इमारतीची दुरुस्ती संस्थेने करण्याच्या अटीवर व या इमारतीच्या बांधकामा बाबत व

सुरक्षिततेे बाबत शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र घेण्याचे अटीवर ही जागा संस्थेस देता येणे शक्य आहे.

३. या प्रकल्पा बाबत प्रशासन अधिकारी अहमदनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ यांचे अभिप्राय प्रकरणी समाविष्ट आहेत. त्यांनी ही जागा देण्याचे अधिकार महानगरपालिकेस असल्याचे त्यांचे पत्र क्र. ३/२/३२ दिनांक १७/४/२००७ रोजी कळविले आहे. ही जागा गेल्या अनेक वर्षा पासुन पडीक असुन शाळेसाठी वापरली जात नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता. तसेच या जागेत महानगरपालिका शाळेच्याच विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्याचा संस्थेचा प्रकल्प असल्याने ही जागा उपरोक्त प्रकल्पा करीता देण्यास हरकत नाही. संस्थेच्या प्रस्तावात वाजवी भाडे भरण्याचा उल्लेख नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ड) प्रमाणे या प्रकल्पासाठी वाजवी भाडे घेणे आवश्यक आहे असे मत आहे. संस्थेने हा प्रकल्प महानगरपालिका व संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबवावयाचा असल्याने भाड्याचा उल्लेख केलेला नाही. मात्र या संस्थेच्या या प्रकल्पावर मा.आयुक्त, मा.महापौर हे सदस्य म्हणुन नियुक्त झाले तरी ही एक स्वतंत्र संस्था राहणार असल्याने या संस्थेकडून महानगरपालिकेने भाडे वसुल करणे गरजेचे आहे.

४. विषयांकित मालमत्तेची एकुण किंमत खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अ. जागेची किंमत रु. -- | २,२०,७७०/- |
| ब. बांधकामाची किंमत (अंदाजे) रु. | १,४०,४९०/- |
| क. एकुण किंमत रु. -- | ३,६१,२६०/- |

वरील प्रमाणे या मालमत्तेची एकुण किंमत सुमारे ३,६१,२६०/- इतकी आहे. ही किंमत रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क) अन्वये ही जागा देण्याच्या प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे. या जागेचे वार्षिक भाडेमूल्य ठरवितांना या इमारतीची दुरुस्ती सदर संस्था स्वखर्चाने करणार आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता या दुरुस्तीच्या खर्चाचा विचार करुन तसेच या इमारतीचा भविष्यातील देखभाल खर्च संस्थेने करावयाचा आहे. ही बाब विचारात घेवुन या जागेचे वार्षिक भाडेमुल्य रुपये २६,०००/- इतके येते.

सबब हे भाडे आकारण्याच्या अटीवर व इतर नेहमीच्या अटीवर ही जागा संस्थेस सुरुवातीस तीन वर्षाकरीता देणे योग्य होईल असे मत आहे. तीन वर्षानंतर संस्थेची कामाची प्रगती पाहुन व त्यावेळचे मासिक भाडे ठरवुन ही मुदत वाढ देणे योग्य होईल.

उपरोक्त मुद्दे विचारात घेता सदर प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य होईल. आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, " अ " नुसार मंजूरीस्तव मा.महासभेपुढे सदरचा प्रस्ताव पाठविण्याच्या मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो, यांचा अभिप्राय की, CAFO व Auoditar यांचा सर्व फाईलवर अहवाल घेणेबाबत सुचित केलेले आहे. तरी आधी त्यांचा अहवाल न घेता फाईल पाठवू नये. त्यांचा अहवाल घेवून फाईल पाठवावी. फायनल मॅटर पण आहे.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, मा.मुख्य लेखापाल यांचेकडे योग्य तो अभिप्राय देण्यासाठी सस्नेह अग्रेषित.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचेकडुन सविनय सादर की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ७९ (क) नुसार मा.आयुक्तास महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल. अशी तरतूद असल्याने

मंजूरीस्तव सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे योग्य. जागेचे भाडेमुल्य मा.महासभेच्या मंजूरीनंतर ठरविता येईल. मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, नगर रचनाकार समक्ष चर्चा करा.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, चर्चा झाली. आयुक्तांचे मताशी सहमत. प्रस्ताव महासभेपुढे घेणेत यावा.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) , मा.आयुक्त सो, नगररचनाकार , मुख्यलेखाधिकारी , व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा :**

मा.श्री.अशोक कानडे :- सदरचा विषय मंजूर करावा.

मा.श्री.कृ.द.जाधव :- सदर संस्थेला जागेची आवश्यकता आहे. जागेचा प्रश्न आपण सोडवू शकतो याबाबत महानगरपालिका संस्थांचेही वर्ग चालवित आहे. मा.महापौर यांनी सदरचा विषय मंजूर करावा असे सांगितले.

मा.श्री.कैलास गिरवले :- यापुर्वी स्नेहालय या संस्थेस शाळा क्रमांक १४ च्या दोन खोल्या दिलेल्या आहेतच या ठिकाणी ते उपक्रम चालू शकतात. संस्था महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देणार आहे असे सांगितले. तर मग महानगरपालिकेच्या रेल्वेस्टेशन सावेडी, इत्यादी लांबचे विद्यार्थी याठिकाणी प्रशिक्षणास येवू शकणार आहेत काय सदर संस्था महानगरपालिकेच्या शाळेत तेथे जावून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण का देत नाही. सदर संस्थेच्या कार्याबद्दल आम्हाला आदर आहेच याठिकाणच्या जागेत महानगरपालिका स्वतःच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा का चालवत नाही. शिक्षण मंडळाकडील गेल्या १० वर्षापासुन चुकीच्या पध्दतीने दिल्या गेलेल्या ब-याचशा शाळा खोल्यांचे जागा भाडे वसुली बाबत मा.श्री.भाउसाहेब जाधव, सदस्य यांनी वारंवार सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केले आहेत. व अशा प्रकारे ५० लाख रुपयांच्या थकबाकी बाबतचा आवाजही उठविलेला आहे. सदरची थकबाकी महानगरपालिकेला अजून मिळालेली नाही. त्यामुळे एवढी मोठी शाळा सदर संस्थेला कशाकरीता द्यावयाची.

मा.श्री.शं.ह.घुले :- झोपडपट्टीतील तसेच दुर्बल घटकातील मुला-मुलींना संगणक शिक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून स्नेहालय संस्थेने जागेची मागणी केलेली आहे. ब-याचशा शाळा यापुर्वी महानगरपालिकेने संस्थांना दिलेल्या आहेत.

यावर श्री.गुळवे प्रशासनाधिकारी नगरपालिका शिक्षण मंडळ, विविध संस्थांना दिलेल्या शाळा खोल्यांच्या बाबतीत खुलासा सादर केला यावर मा.महापौर यांनी प्रशासनाधिकारी यांना शिक्षण मंडळाकडील नाईटवॉचमन यांच्याकडे असलेल्या खोल्याबाबतही काय कार्यवाही केली याबाबत विचारणा केली. कर्मचा-यांवरही कारवाई करावी व त्यांचेकडुन वसुली करावी.

मा.श्री.कैलास गिरवले :- सदर बाबतचा विषय गंभीर स्वरुपाचा आहे. इंग्रजी माध्यमाची शाळा महानगरपालिका चालवू शकते याबाबत मला जागा संस्थेला देण्याबाबत ब-याच जणांचे फोन आले परंतु मी कोणाच्याही दबावाला भिक घालत नाही. सदर जागा कोणासही देण्यात येवू नये असे माझे स्पष्ट मत आहे.

मा.श्री.संजय चोपडा :- सदर संस्थेचे काम चांगले आहे. सदर संस्थेस जागा देण्यांत यावी.

मा.श्री.नितीन जगताप :- स्नेहालय या संस्थेचे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये चांगले काम आहे. महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने सदर संस्थेस मदत करावी मात्र जागा देण्यात येवू नये.

मा.श्री.शं.ह.घुले :- शिक्षण मंडळाच्या शाळांमधील ब-याचशा खोल्या संस्थांना दिल्या गेल्यामुळे ४३ लाख रुपये भाडे थकीत आहे. त्यामुळे त्याकरीता स्पेशन बोर्ड बोलावुन कायदेशिर कारवाई करावी व जागा ताब्यात घेण्यांत याव्यात. तथापि स्नेहालय ही संस्था बरेच सामाजिक कार्य उदा-एडस् महिला आणि मुलांचे कल्याण इ.कार्य करीत आहे. तसेच त्यांच्याकडे पुर्वी असलेल्या खोल्यांचे भाडेही त्यांनी भरले आहे. सदर संस्थेला मोठ्या अभिमानाने जागा द्यावी.

मा.श्री.मिलींद गंधे :- सन १९९५ मध्ये सदर संस्थेने ही जागा मागितली होती. पुर्वीच जर ह्या संस्थेला जागा दिली असती तर गोरगरीब विद्यार्थ्यांची ते सोय करु शकले व इतर शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण घेवू शकले असते. तरी सुध्दा जागा देणे बाबत ठराव मंजूर करण्यांत यावा. तसेच या संस्थेच्या कार्यकारिणीवर मा.महापौर व मा.आयुक्त यांचे प्रतिनिधी नेमावेत.

मा.श्री.त्रिपाठी :- सामाजिक संस्थेस महानगरपालिकेने मदत करणे आवश्यक आहे. थकबाकी वसुली बाबत मा.महापौर यांनी उपायुक्त (कर) यांना उत्तरे द्यावीत असे सुचविले. यावर उपायुक्त यांनी शाळा खोल्या ताब्यात असलेल्या संबंधित संस्थांकडून नियमानुसार कारवाई करुन भाडे वसुल करण्यांत येईल.

मा.श्री.सुळ दिपक उपमहापौर :- यापुर्वी तीन चार सभेमध्ये ब-याच वेळा प्रॉपर्टी बाबत चर्चा झाली आहे. महानगरपालिकेमध्ये पॉपर्टीच्या नोंदी घेणेकरीता प्रॉपर्टी इनचार्ज नाही. त्यामुळे सर्व नांवे लावणे, जागा मिळविणे, याबाबत कारवाई करावी आणि आढावा घेण्यात यावा.

मा.श्री.त्रिपाठी :- वेळोवेळी सभेमध्ये चर्चा होते परंतु बोर्ड संपल्यानंतर त्यावर कारवाई केली जात नाही.

मा.श्री.गारुडकर अंबादास :- शिक्षण मंडळाच्या अनेक संस्थांना दिलेल्या जागांबाबत चर्चा चालू आहे. या जागा ज्या संस्थांना दिल्या आहेत त्यामध्ये स्नेहालय संस्था उपेक्षितांसाठी चांगले काम जिल्हयामध्ये करीत आहे. त्यांना जागा देण्यात यावी.

मा.श्री.अशोक कानडे :- विविध संस्थांना जागा दिलेल्या आहेत. तसेच स्नेहालयावर अन्याय होत आहे. या विषयाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. जो घटक शिक्षणापासुन वंचित आहे अशा घटका करीता चाईल्ड लाईन या करीता जागा दिली पाहिजे.

मा.महापौर :- ज्या ज्या संस्थांना जागा यापुर्वी दिलेल्या आहेत त्याबाबतचा अहवाल पुर्ण करुन पुढील सभेपर्यंत सादर करावा असे आदेश दिले.

मा.श्री.अशोक कानडे :- तरी स्नेहालय संस्थेला जागा देण्यात यावी.

मा.श्री.उडाणशिवे :- सदर संस्था ही झोपडपट्ट्यातील मुलांना तेथे येवुन शिक्षण देणार आहे काय. झोपडपट्टीतील समाज मंदिर त्यांच्याकडुन वापरले जात आहे. त्याठिकाणी संगणक शिक्षणाची सोय होवू शकेल परंतु ते न करता इतर शाळांमध्ये ती सोय करीत आहे. समाज मंदिर त्यामुळे प्रत्यक्ष समाजातील लोकांना वापरावयास मिळत नाही. याबाबतही चौकशी करण्यात यावी.

मा.श्री.अभय आगरकर :- स्नेहालय रुरल डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च कम्युनिकेशन सेंटर व महानगरपालिका यांच्या जॉईंट व्हेंचरने मनपा शाळेतील गरीब गरजू विद्यार्थ्यांना संगणकीय प्रशिक्षण ही संस्था देणार आहे. तसेच या संस्थेचे काम अनेक वर्षापासुन चालू आहे. शिक्षण मंडळामार्फतही स्पर्धा परिक्षा, आदर्श शिक्षण मंडळ व त्यांचेकडील प्रकल्प राष्ट्रीय पारितोषिका साठी शिफारस होत आहे. ही शिक्षण मंडळाची उद्दीष्टये आहेत. त्याचप्रमाणे स्नेहालय ही संस्था गरीब गरजू घटकांसाठी काम करीत असल्याने त्या संस्थेला जागा देण्यांत यावी.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, स्नेहालय ही चांगले सामाजिक काम करणारी संस्था आहे. शिक्षण मंडळाकडुनही विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत चांगले काम होत आहे. शिष्यवृत्ती परिक्षा, स्पर्धापरिक्षा केंद्र , अपंग समावेशित शिक्षण केंद्र इ. राष्ट्रपती पारितोषिकासाठी जाणार आहे. महानगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रमुखही चांगले काम करीत आहेत. त्यामुळे अशा कामाकरीता महानगरपालिका शाळेस जागा देणे इष्ट होईल.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट व साधक - बाधक झालेल्या चर्चेनुसार ठरविण्यात येते की, महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळेच्या ज्या खोल्या सक्षम प्राधिकरणाची मंजुरी न घेता देण्यात आलेल्या आहेत अशा बाबत प्रशासनाने संपुर्ण माहिती संकलित करावी. तसेच मा.आयुक्त यांनी ज्या कारणासाठी शालेय इमारतीच्या खोल्या देण्यांत आलेल्या आहेत त्या कारणानुसार वापर न करता प्रत्यक्ष इतर कारणासाठी वापर होत असल्याबाबत तसेच वैयक्तिक वास्तव्य करीत असल्याबाबत देखील जे प्रकार निदर्शनास आलेले आहेत अशा इमारतीच्या खोल्या ताब्यात घेण्याचे दृष्टीने कार्यवाही करावी. तसेच भाडयाचे थकबाकी वसुली बाबत देखील योग्य ती कार्यवाही करावी.

स्नेहालय व रूरल डेव्हलपमेंट रिसर्च अँण्ड कम्युनिकेशन या संस्थेकरीता महानगरपालिकेचे मैनाबाई देशपांडे मुलींची शाळा, मैदान आड येथील शाळेची इमारत देण्यास प्रस्तावानुसार मान्यता देण्यात येत आहे. मात्र त्यातील एक खोली वाडिया पार्क लेडिज क्लब ,अहमदनगर यांना देण्यास देखील या ठरावाद्वारे मंजुरी देण्यात येत आहे. सामाजिक हितासाठी काम करणा-या संस्थेचा विचार करता नाममात्र भाडयाने सदरच्या खोल्या देण्यास मंजुरी देण्यात येत असुन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव
अनुमोदक : मा.श्री.अनंत जोशी
ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : २५-०६-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिकेतर्फे कायम विना अनुदान तत्वावर दोन माध्यमिक शाळा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : महानगरपालिकेतर्फे नविन कायम विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा सुरू करणेसाठी चलन भरणेसाठी रू. १०,००० /- (दोन शाळांसाठी ) मंजुर केलेले आहे. तथापि मा.मुख्य लेखाधिकारी,अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर यांनी प्रस्तुत टिप्पणीमध्ये मनपा शाळांमधील उपलब्ध असलेला शिक्षक स्टाफ यांनीच माध्यमिक शाळांवर अध्यापनाचे काम करावे असे सुचित केलेले आहे.

परंतु महानगरपालिकेने माध्यमिक शाळा सुरू केल्यास मनपाच्या शाळेतील अनु.जाती - जमात, अल्पसंख्यांक , आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांची खाजगी शाळांकडून प्रवेशाबाबत जी अवहेलना होते ती निश्चितपणे थांबेल. मनपाने माध्यमिक शाळा सुरू करणे योग्य असुन त्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता असणारा अध्यापक वर्गाची नेमणूक स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षण मंडळाकडे शासनाचा कोणताही निधी उपलब्ध नाही. हा सर्व खर्च अनुदान प्राप्त होईपर्यंत मनपाने करणे योग्य होईल.

माध्यमिक शाळासंहिता नियम नियमावलीनुसार माध्यमिक शाळांसाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग असावे असे नमूद केलेले आहे. प्राथमिक आस्थापनेवरील स्टाफ हा पूर्णपणे प्राथमिकसाठी आहे. माध्यमिक विभागासाठी आवश्यक असणारी शैक्षधिक पात्रता ही प्राथमिक विभागाच्या आस्थापनेकडे नाही.

तरी पुढील आदेशार्थ सविनय सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावित बाब धोरणात्मक स्वरूपाची असलेमुळे आपले स्तरावर निर्णय घेणे संयुक्तिक.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, माध्यमिकसाठी ८ वी च्या वर्गाला शासनाकडुन मान्यता मिळाल्यास वर्ग चालू करणेस हरकत नाही. तथापि त्यासाठी आवश्यक कर्मचारी व अनुदान शासनाकडून मिळणार नाही. सदर मंजुरी ही कायम विनातत्वावर राहणार

आहे. कर्मचा-यांना वेतन देण्याची जबाबदारी ही पूर्ण मनपाची राहील. सदर बाब धोरणात्मक असल्याने मा.महासभेपुढे निर्णयार्थ ठेवणे योग्य.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, "अ " प्रस्तावित नुसार सदर बाब धोरणात्मक असल्याने मा.महासभेत विषय ठेवुन निर्णय घेणे अत्यावश्यक असल्याने महासभेकडे पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मुख्य लेखा परिक्षक , मुख्यलेखाधिकारी , मा.उपायुक्त (सा) , व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

-- * --

चर्चा :

मा.श्री.अनंत जोशी :- महानगरपालिका शिक्षण मंडळामार्फत कायम विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी प्रस्ताव सादर झालेला आहे. यामध्ये कार्यालयीन प्रस्तावामधील पॅरा क्रमांक १ व पॅरा क्रमांक २ एकमेकांशी विसंगत आहेत. त्याचप्रमाणे याबाबतची आणखी एक टिप्पणी मिळालेली आहे. कायम विना अनुदान तत्वावर वर्ग चालविण्या करीता १५ लाख रुपयांचा खर्च येणार आहे. याकरीता किती शिक्षक आवश्यक आहेत. त्यासाठी प्रत्यक्षात किती खर्च येणार आहे. यावर महानगरपालिकेचा होणारा खर्च अयोग्य आहे. शिक्षण मंडळाकडे फक्त प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी आहे. माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी नाही. त्यामुळे माझा यास विरोध आहे.

मा.श्री.शं.ह.घुले :- महानगरपालिकेच्या शाळेमध्ये आर्थिकदृष्टया गोरगरीब नागरिकांची मुले शिक्षण घेत असतात. सर्वांसाठी शिक्षण ही जबाबदारी आहे. अशाच प्रकारे इतर काही महानगरपालिकांनी माध्यमिक शाळा सुरु केलेल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांकरीता माध्यमिक शाळा वर्ग चालू करणे. हा विषय मंजूर करावा अशी विनंती केली.

मा.श्री.अशोक कानडे :-माध्यमिक शाळा चालू करण्यासाठी वर्ग चालू करावा.

यावर आयुक्त यांनी खुलासा केला की, शिक्षण पध्दती बाबत सविस्तर चर्चा केलेली आहे. माध्यमिक वर्गासाठी माध्यमिक शिक्षण विभाग करावा लागेल. तसेच नियमानुसार आठवीच्या वर्गांकरीता पदवीधर व बी.एड. पात्रता असणारे शिक्षण नेमावे लागतील. तो खर्च महानगरपालिकेला करावा लागेल.

मा.श्री.अनंत जोशी :- महानगरपालिका शिक्षण मंडळाकडे सध्या अतिरिक्त शिक्षक आहेत काय. याबाबत खुलासा करावा.

यावर प्रशासनाधिकारी गुळवे यांनी अतिरिक्त शिक्षक नसल्याचा खुलासा केला.

मा.श्री.अनंत जोशी :- तथापि महानगरपालिकेच्या शाळेतील पटावर विद्यार्थ्यांची संख्या खोटी लिहीली जाते. प्रत्यक्षात विद्यार्थी नसतात असे अनंत जोशी यांनी सांगितले त्यामुळे सभागृहाची दिशाभुल होत आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न कमी होत असतांना अशा प्रकारे माध्यमिक शिक्षणाचा महानगरपालिकेने वाढविणे योग्य नाही. त्यास माझा विरोध आहे.

मा.श्री.शं.ह.घुले, मा.श्री.अभय आगरकर :- विषय कशा प्रकारे घेण्यांत आलेला आहे.

प्रशासनाधिकारी श्री.गुळवे यांनी खुलासा केला की, माध्यमिक शिक्षण हे प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अखत्यारीत नाही. हा वेगळा विभाग आहे.

त्यावर शं.ह.घुले यांनी सांगितले की, शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. त्यामुळे शिक्षण देणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. पिंपरी चिंचवड हे अशा प्रकारे शिक्षण विभाग राबवित असेल तर अहमदनगर महानगरपालिकेला चालू करणे शक्य आहे. इतर महापालिकाही अशा प्रकारे चालवित असतील तर याबाबतचा विचार करावा. मनपातील विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारे डोनेशन द्यावे लागत नाही.

महापौर :- महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आपण सुरुवातीला फक्त दोन वर्ग मंजूर करु असे सांगितले.

मा.श्री.अभय आगरकर :- महानगरपालिकेची प्राथमिक शिक्षण सेवा सुविधा सुरुवातीस चांगली ठेवावी. माध्यमिक शिक्षण चालविण्यासाठी महानगरपालिका शिक्षण प्रशासनाधिकारी यांचे कायदेशिर नियंत्रण नाही. त्यामुळे याबाबतीत माध्यमिक शिक्षण वर्गाचा आस्थापना खर्च वाढणार असुन इतर महानगरपालिकेकडे शाळा अनुदान तत्वावर असुन दि.३०/१२/१९९८ च्या जी.आर.प्रमाणे संस्थांना अनुदान मिळणार नाही. माध्यमिक शिक्षण विभाग स्वत: चालवुन खर्च सोसावा लागणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेने प्रथम प्राथमिक शिक्षण सुधारावे माध्यमिक शिक्षण सुरु करण्यास आमचा विरोध आहे.

यावर आयुक्त यांनी खुलासा केला की, माध्यमिक शिक्षणाचे वर्ग चालू करावे लागल्यास त्यास बी.एड., एम.एड.शिक्षक घ्यावे लागतील सध्याचे सर्व शिक्षा अभियानामधील बी.एस.सी.बी.एड., एम.पी.एड. इत्यादी शिक्षक चालवु शकणार नाहीत. तसेच प्रशासनाधिकारी यांनी सर्व शिक्षा अभियानातील शिक्षक माध्यमिक शिक्षणाकडे वापरता येणार नाही.

यावर पाउलबुधे यांनी मात्र मंजूर करावे असे सुचविले.

मा.श्री.अभय आगरकर :- या बाबत भुमिका स्पष्ट करतो की, महानगरपालिकेने अशा प्रकारे उपक्रम चालवू नये असे आमचे म्हणणे नाही. चांगल्या गोष्टी करीता आमचा विरोध असण्याचे कोणतेही कारण नाही. प्राथमिक शिक्षण चांगल्या प्रकारे दत असाल तरच पुढे माध्यमिक शिक्षण होवू शकेल. त्यामुळे अगोदर प्राथमिक शिक्षण सक्षम करणे जरुरीचे आहे. यामध्ये माध्यमिक शिक्षण विभागावर सध्याचे प्राथमिक शिक्षणाचे शिक्षणाधिकारी यांचे कायदेशिर नियंत्रण रहाणार आहे काय ?

त्यावर प्रशासनाधिकारी गुळवे यांनी काम करता येणार नाही असे नमुद केले.

मा.श्री.आगरकर :- पुढे सांगितले की, आस्थापना खर्च वाढणार असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका या ठिकाणी ५० - ५० वर्षापासुन महानगरपालिका आहे. तसेच दि.३०/१२/१९९८ जी.आर.चा निर्देश पाहता आपले महानगरपालिकेस याबाबत अनुदान दिले जाणार नाही. त्यामुळे यास आमचा विरोध आहे.

मा.श्री.कृ.द. जाधव :- महानगरपालिकेतील शाळांचा दर्जा उंचावलेला आहे. खालच्या पातळीचा विचार करता यापुढे आठवीचे वर्ग चालू करावेत असे सुचविले. व मानसिकता वाढवावी.

महानगरपालिकेच्या जलविहारास ५० वर्ष पुर्ण झालेली असल्याने तेथील जलपुजनाचा कार्यक्रम मंजूर करावा अशी विनंती केली.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट व सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार ठरविण्यात येते की, मा.शासनास महानगरपालिकेच्या वतीने कायम विना अनुदान तत्वावर एक माध्यमिक शाळा (वर्ग) प्रायोगिक तत्वावर सुरू करावे. याबाबत माहिती सादर करावी. व सदरच्या खर्चासाठी मा.शासनाचे विशेष अर्थसहाय्य उपलब्ध होण्याकरीता पाठपुरावा करण्यात यावा.

सुचक : मा.श्री. कृ.द.जाधव

अनुमोदक : मा.श्री. अशोक कानडे

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : २५-०६-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : बुरूडगांव रोडवरील नगर रचना योजना, अहमदनगर क्र.३ अं.भु.क्र.९२ या जागेमध्ये बी.ओ.टी.अथवा अन्य पध्दतीने भाजी मंडईसह व्यापारी संकुल विकसित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : १. नगर रचना योजना अहमदनगर क्र. ३ अं.भु.क्र.९२ ही संपुर्ण जमिन नगर रचना योजनेच्या माध्यमातुन अहमदनगर महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली असुन ती अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीची आहे. जमिनीचे एकुण क्षेत्रफळ ४९५७.०० चौ.मी.इतके आहे.

२. विषयांकित जमिन ही पुर्वीच्या मंजुर विकास आराखडयाप्रमाणे व मंजुर नगर रचना योजना क्र. ३ मधील प्रस्तावा नुसार भाजी मंडई या उद्येशासाठी राखीव ठेवलेली होती. त्यानुसार तत्कालिन नगरपालिकेने या जागेवर सन १९९१-९२ साली सदर भाजी मंडईचे काम पुर्ण केले. मुळातच या भाजी मंडई प्रकल्पाचे काम पुर्वीपासुन रेंगाळलेले होते. या प्रकल्पाचे नकाशे व अंदाजपत्रक खुप पुर्वी म्हणजे सन १९७८-७९ साली करण्यात आले होते. या कामासाठी त्यावेळेस राज्यशासनाकडुन २,२२,७३४ ( दोन लाख बावीस हजार सातशे चौतीस फक्त ) इतकी कर्ज रक्कम सुध्दा घेण्यात आली होती. तथापि विविध कारणामुळे हा प्रकल्प प्रलंबित राहिला व त्याचे काम वर नमुद केल्याप्रमाणे सन १९९१-९२ मध्ये पुर्ण झाले. भाजी मंडईचे काम पुर्ण झाल्यावर या मंडईतील ओटयांचे भाडे पध्दतीने वितरण करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात ही भाजी मंडई सुरू होउ शकली नाही. ही वस्तुस्थिती लक्षात आल्यावर तत्कालिन नगरपालिकेच्या स्थायी समितीने ठराव क्र. ८६ दि.३-१२-१९९९ अन्वये संबंधित गाळे धारकांना नोटीसा देवुन सदरचे गाळे तत्कालिन नगरपालिकेने ताब्यात घेतले. त्यानंतर तत्कालिन नगरपालिकेने ठराव क्र.४४ दि.१५-०५-२००१ अन्वये ही जागा प्रकल्प संचालक, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा अहमदनगर यांना भाडेपट्टयाने देणे बाबतचा ठराव केला. मात्र या संस्थेनेही सदर जागेचा कोणताही वापर सुरू केला नाही. मध्यंतरीच्या काळात तत्कालिन नगरपालिकेने या जागेपैकी दक्षिणेकडील काही क्षेत्रावर व्यायाम शाळेचे बांधकाम केलेले आहे.

३. आजमितीस या भाजीमंडईची अवस्था अतिशय वाईट झालेली असुन जागेवर कोणताही वापर सुरू नसल्याने सध्या या जागेस कचरा कुंडीचे स्वरूप आलेले आहे. त्यामुळे आजुबाजूच्या रहिवाशांचे आरोग्य धोक्यात येवु शकते.

४. शासनाने मागील वर्षी मंजुर केलेल्या दुस-या सुधारित आराखडयामध्ये या जागेचे आरक्षण भाजी मंडई व दुकान केंद्र असे करण्यात आलेले आहे. त्यामुळे या जागेवर नव्याने बी.ओ.टी.तत्वावर किंवा अन्यमार्गाने ( डिपॉझिट पध्दतीने ) भाजी मंडईसह दुकान केंद्र असा प्रकल्प उभा केल्यास या जागेचा चांगल्या रितीने विनियोग सुरू होईल.

५. सदर जागेचे क्षेत्र ४९५७.०० चौ.मी.असुन या एकुण क्षेत्रावर झालेल्या बांधकामाचा आराखडा सोबत जोडलेला आहे. या आराखडयावरून दिसुन येईल की, या जागेच्या दक्षिण भागात व्यायाम शाळा बांधण्यात आलेली आहे. ही व्यायामशाळा अलिकडच्या काळात बांधलेली असल्याने सद्यस्थितीत ही इमारत पाडणे योग्य होणार नाही त्यामुळे सदर जागेच्या एकुण क्षेत्र ४९५७.०० चौ.मी.पैकी व्यायाम शाळेचे क्षेत्र २२०४.२० चौ.मी.सोडुन उर्वरित उत्तरेकडील भागाचे क्षेत्र २७५२.८० चौ.मी.क्षेत्रावर भाजी मंडईसह व दुकान केंद्र हा प्रकल्प राबविणे योग्य होईल.

असा प्रकल्प राबविणेसाठी मा.महासभेची मंजुरी आवश्यक असल्याने सदरचा विषय मा.महासभेत मान्यतेसाठी सादर करणे योग्य होईल याबाबतीत मा.महासभेने धोरणात्मक निर्णय घेतल्या नंतर सदर बाबतचा तपशिलवार प्रस्ताव मा.स्थायी समितीस सादर करण्यात येईल.पुढील आदेशार्थ सादर.

सोबत : सदर जागेचा नकाशा जोडलेला आहे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित मा.महासभेकडे पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा. उपायुक्त (सा) , व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

मा.श्री.नितीन जगताप :- सन १९९२ पासुन सदर भाजी मार्केट अर्धवट अवस्थेत आहे. आजुबाजूची परिस्थिती अत्यंत खराब व घाण झालेली आहे. याबाबत मी मनपाला दोन पत्रे दिलेली आहे. सदर ठिकाणी बी.ओ.टी.तत्वावर भाजी मार्केट, गाळे व छोटेशे सभागृहही बांधावे. सदर जागा भाजी मार्केट साठी आरक्षीत आहे. सदर ठिकाणी खाली भाजी मार्केट व वरती सभागृह करणेस हरकत नाही. तसेच सदर ठिकाणचा चौकही सुशोभिकरण बी.ओ.टी. तत्वावर करणे बाबत मंजूरी देवुन विषय मार्गी लावावा व हा विषय सभेपुढे घेतल्या बद्दल आभार मानतो.

यावर महापौर यांनी खुलासा केला की, सदरचे काम बी.ओ.टी तत्वावर होणार आहे.

मा.श्री.त्रिपाठी :- आत्ताच श्री.जगताप यांनी जी सूचना मांडली ती योग्यच आहे. १५ वर्षापासुन या जागेचा कुठलाही वापर नसुन कचराकुंडी झालेली आहे. यामधुन महानगरपालिकेला उत्पन्न मिळू शकले असते. तरी हा विषय मार्गी लावावा हि विनंती.

मा.श्री.शिंदे :- भाजी मार्केटचा विषय बी.ओ.टी. वर घेतलेला आहे. त्याप्रमाणे सदरच्या ठिकाणचा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे तोही करावा. तसेच चौकामध्ये इलेक्ट्रीक पोल अडथळा असल्यामुळे इलेक्ट्रीक पोल हलविण्यांत यावे व कार्यवाही त्वरीत व्हावी.

मा.श्री.चोपडा :- हा एक चांगला विषय भाजीमार्केटचा आणल्याबद्दल अभिनंदन करतो.

मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी :- सावेडी भाजी मार्केट बाबतही पुढील कार्यवाही करण्यांत यावी याबाबतचे उत्पन्न बुडत आहे.

याबाबत मा.महापौर यांनी दोन दिवसांत निविदा मागवुन कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर. सदर प्रस्तावाच्या निविदा तातडीने मागविण्यात याव्यात.

तदनुषंगिक खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.नितीन जगताप

अनुमोदक : मा.श्री.किशोर डागवाले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-x
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक :२५-०६-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर शास्त्रोक्त प्रक्रीया करून खत निर्मिती, उर्जा निर्मिती, बायो गॅस निर्मिती प्रकल्प उभारणेबाबत मा.स्थायी समितीचा ठराव, अटीं व शर्तीसह ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करुन खत निर्मिती / उर्जा निर्मिती / बायोगॅस निर्मिती प्रकल्प बांधा, वापरा, व हस्तांतरीत करा (बी. ओ. टी.) तत्वावर उभारणे कामी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिर फेर टेंडर नोटीस प्रमाणे मुदतीत खालील प्रमाणे दोन निविदाकार यांचेकडून सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१) हायड्रोएअर टेक्नोटिक्स (पी.सी.डी.) लि. बेलापूर ,नवी मुंबई .

२)अजिंक्य बायोफर्ट , प्लॅट नं.७, मयुरेश सोसायटी, फाटक बाग, पुणे-३०.

सदरच्या सिलबंद निविदा मा.उपायुक्त (कर) यांचे दालनात उपस्थित निविदाकार यांच्या समक्ष उघडण्यात आल्या.त्यानंतर प्राप्त झालेल्या फेरनिविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.
१) हायड्रोएअर टेक्नोटिक्स (पी.सी.डी.) लि. बेलापूर ,नवी मुंबई .

सदर खाजगी एजन्सी प्रकल्पाचा संपुर्ण भांडवली खर्च स्वतः करणार आहे व प्रकल्पापासुन मिळणाऱ्या उत्पन्नावर ५ % रॉयल्टी देणार आहे. तसेच महानगरपालिकेची संपुर्ण सॅनेटरी लॅन्डफिल साईट डेव्हलमेंट स्वखर्चाने उभारून देखभाल व दुरूस्ती स्वखर्चाने करण्यास तयार आहे.तसेच कुठलेही टिपींग चार्जेस सुध्दा घेणार नाही.असे निविदेमध्ये नमूद केले आहे.

२) मे.अजिंक्य बायोफर्ट ,फाटक बाग ,पुणे .

सदर खाजगी एजंन्सीने घनकच-यावर प्रक्रिया करून गांडूळखत निर्मिती प्रकल्प उभारणेबाबतचा प्रस्ताव निविदेमध्ये सादर केलेला आहे.प्रकल्प उभारणीचा खर्च व देखभालीचा निविदेमध्ये नमूद केलेला खर्च देण्याची व्यवस्था महानगरपालिका करेल असे नमूद केलेले आहे.निविदेमध्ये रॉयल्टीची टक्केवारी नमूद केलेली नाही.तसेच टिपींग चार्जेस प्रकल्पावर येणा-या एकूण कच-याच्या वजनाच्या रूपये २५०/- प्रति टन व लॅंडफील चार्जेस उर्वरीत कच-याच्या वजनाच्या रूपये १३०/- प्रति टन महानगरपालिकेने द्यावे असे नमूद केले आहे.तसेच निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी व्यतिरीक्त अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत.

वरील प्राप्त झालेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता पाहता एकच निविदा ही " बी.ओ.टी " तत्वावर असल्याची दिसुन येते याची नोंद घेवुन प्रशासकीय संपूर्ण प्रकरणांसह प्रस्ताव दि.२/१/२००८ रोजीच्या छाननी समीतीसमोर ठेवण्यात आला असता सदरच्या छाननी समीतीमध्ये सदर प्रस्तावाचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे चर्चा करून बदल प्रस्तावित करण्यात आले.

सदरचा प्रकल्प हा बी.ओ.टी.( बांधा वापरा व हस्तांतरीत करा ) या तत्वावर असल्या कारणाने मनपाला शासनाकडुन प्राप्त होणारे १२ वा वित्त आयोग व इतर कोणत्याही संस्थेकडुन प्राप्त होणारे निधी, अनुदान यावर मनपाचा अधिकार राहील. त्यावर निविदाकाराचा कसलाही संबंध असणार नाही. त्याचप्रमाणे निविदेतील अट क्र. १,२,३ बाबत या अनुषंगाने बदलाची नोंद निविदाकार यांनी घेणे बंधनकारक आहे.निविदेतील अट क्र.८ मधील " मनपा सहकार्य करेल " याचा अर्थ मनपा फक्त आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देईल.

निविदेतील अट क्र.९ चे अनुषंगाने मनपा प्रकल्प काळात फक्त पाण्याचे कनेक्शन उपलब्ध करून देईल त्याची शुल्क नियमानुसार निविदाकारास भरावे लागेल. विद्युत जोडणीस मनपा सहकार्य करेल मात्र आवश्यक ते शुल्क व इतर बार्बीची पुर्तता कंत्राटदारास करावी लागेल.

निविदेतील अट क्र.१० चे अनुषंगाने निविदाकारास नियमास अधिन राहुन इतर उत्पादन करणे पुर्वी मनपाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

सदर प्रकल्प हा कार्यादेश दिल्यापासुन चार महिन्याचे आत कार्यान्वित होणे बंधनकारक राहील.

निविदेतील अट क्र.१३ च्या अनुषंगाने म.न.पा.कचरा डेपोवर कचरा उपलब्ध करून न दिल्यास निविदाकाराची कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

निविदेतील अट क्र.२३ ही पुर्णत : रद्य करण्यात आलेली आहे, याची नोंद निविदाकाराने घ्यावी.

निविदेतील अट क्र.२५ ही वगळण्यात येउन त्या ऐवजी खालील प्रमाणे नोंद घ्यावी. प्रकल्प कालावधी दरम्यान मनपा हद्यीतील निर्माण होणारा घनकचरा उपलब्ध करून दिला जाईल. सन २००८-२००९ या वर्षासाठी साधारणतः अंदाजे ७० मे टन प्रती दिन कचरा उपलब्ध करून दिला जाईल. तसेच दरवर्षी होणा-या लोकसंख्येच्या वाढीव प्रमाणात होणारे कचरा वाढीचे प्रमाण लक्षात घेउन वेळोवेळी निर्माण होणारा वाढीव कचरा निविदाकार यांनी घेणे बंधनकारक राहील.

निविदाकार याने नमुद केलेली शेकडा रॉयल्टी ही कंपोस्ट खताच्या व निविदाकाराने निविदेत नमूद केलेल्या इतर उत्पादनाच्या एकुण विक्री रक्कमेच्या शेकडा प्रमाणात देणे बंधनकारक राहील.

निविदेतील अट क्र.३२ मधील करारातील कलम ४४ प्रमाणे लवादाकडे तक्रार दाखल करेल व लवादाचा निवाडा कंत्राटदार व मनपा यांच्यावर बंधनकारक राहील. या ऐवजी होणा-या नुकसानीस मनपा कोणत्याही बाबतीत जबाबदार राहणार नाही अशी अट क्र. ३२ मध्ये नोंद घेणे आवश्यक आहे.

निविदेतील अट क्र.३९ व ४३ पुर्णतः रद्य करण्यात आली आहे.

तरी मे. हायड्रोएअर टेक्नोटिक्स (पी.सी.डी.) लि. बेलापूर ,नवी मुंबई या खाजगी एजन्सीचा देकार म. न. पा. च्या दृष्टीने आर्थिक दृष्ट्या हितकारक असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. सदरहू एजंन्सीच्या निविदेमध्ये जोडलेल्या कागदपत्रावरून खत निर्मीर्ती प्रकल्प उभारण्याबाबतचा अनुभव पाहता तसेच महानगरपालिकेने नमूद केलेल्या अटी व शर्ती पाहता सदर एजंन्सीची निविदा प्रथम दर्शनी योग्य वाटते. तसेच त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व इतर आवश्यक परवाने बाबत निविदाकाराने पुर्तता करणे आवश्यक आहे. म.न.पा.च्या सार्वजनिक उदयानांसाठी आवश्यक तो खत पुरवठा निविदाकार यांना करावा लागेल.

लँडफिल साईट भविष्यातील शहराची एकुण कचरा वाढ लक्षात घेवून विकसित स्वतः निविदाकार यांना करावी लागेल. तसेच अटी व शर्ती मध्ये आवश्यकते नुसार बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त, म.न.पा.अ.नगर यांना राहिल.

वरील प्रमाणे बदल करण्याबाबत सुचविण्यात येवुन पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य तसेच मे.हायड्रोएअर टेक्नोटिक्स (PCD) लि.बेलापुर, मुंबई यांची निविदा मनपाच्या दृष्टीने आर्थिक दृष्टया हितकारक दिसुन येते. सदरहु एजन्सीचा खत निर्मिती प्रकल्प उभारणे बाबतचा त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरून अनुभव पाहता तसेच मनपा ने निविदेमध्ये नमुद केलेल्या बहुतांशी अटी व शर्ती मान्य करत असल्याचे पाहता परंतु मा.छाननी समितीने प्रस्तावित केलेल्या बदलास अधिन राहुन मे.हायड्रोएअर टेक्नोटिक्स (PCD ) लि.बेलापुर, मुंबई यांची निविदा योग्य वाटते.

निविदाकार यांनी निविदेतील बेसिस ऑफ ऑफर मध्ये नमुद केलेला मुद्दा क्र. १० अमान्य करण्यात येत आहे.निविदा मंजुर झाल्यानंतर महानगरपालिकेचे विधी सल्लागार यांचे मार्गदर्शनाखाली करारनामा करण्यात येईल व त्यानंतर कार्यरंभ आदेश देणे योग्य राहील.सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समीतीकडे सादर करणे योग्य.

तरी मा. छाननी समीतीने प्रस्तावित केलेल्या मे. हायड्रोएअर टेक्नोटिक्स (पी.सी.डी.) लि. बेलापूर ,नवी मुंबई या खाजगी एजंन्सीचा प्रस्ताव अटी व शर्ती तसेच इतर अनुषंगीक बदलास अधीन राहुन मा.स्थायी समीती पुढे मंजूरीस्तव ठेवणेस सबब सादर.

१. Technolgy on paper ok परंतु Field वर पाहणे जरूर आहे. त्यामुळे सदर कंपनीचा चालु अवस्थेतील Project पाहणे जरूर आहे.

२. सदर Project long term असल्याने कंपनीचे प्रत्यक्ष काम पाहणे जरूर आहे.

३. आपल्या कडचा कचरा सध्या १५० TPD नाही Dept. चे रिपोर्ट नुसार एकुण अंदाजे ७० एवढा आहे. तो करण्यास सदर कंपनी तयार आहे का ? हे विचारणे जरूर आहे.

४. कोणत्याही प्रकारचे कर्ज किंवा इतर आर्थिक व्यवहार या Agreement वर कंपनी करू शकणार नाही.

५. कंपनीला फक्त Rentel Land देणे व फक्त Water Connection याचे Bill कंपनीने भरणे.

६. BOT चे फक्त एकच Tender आलेले आहे , याचाही विचार व्हावा.

७. कोणत्याही परिस्थितीत महानगरपालिका आर्थिक खर्च करणार नाही.

८. कचरा जो मिळेल तो व जेवढा असेल तेवढाच निविदाकारास मिळेल.

९. Agreement नंतर काम एक महिन्यात सुरू करून ४ महिन्यात Processing सुरू झाली पाहिजे. सदरची माहिती स्थायी समितीस द्यावी.

मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, माहितीस्तव सादर प्रस्ताव द्यावा.

उपरोक्त विषयाबाबत मा.स्थायी समितीमध्ये ठराव क्रमांक १३ दि.७-०१-२००८ व ठराव क्रमांक १ दि.२२-०१-२००८ हे दोन ठराव पारित झालेले आहेत . ते खालील प्रमाणे ---

मा.स्थायी समिती सभा क्रमांक १३ दि.७-०१-२००८

ठराव क्रमांक १३

ठराव : घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत बुरूडगांव स.नं.३४ (पैकी ) या जागेवर घनकच-या पासुन खत निर्मिती / उर्जा निर्मिती करणे बाबत बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर मागविलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता , ऑफिस रिपोर्ट पाहता बीओटी तत्वावर प्राप्त झालेली एकमेव अशी मे.हायड्रोएअर टेक्नोटिक्स (PCD) लि.बेलापूर,नवि मुंबई यांच्या निविदेस मनपाने प्रसिध्द केलेल्या निविदेमधील मुळ अटी व शर्ती नुसार मंजुरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर. मात्र मनपा सद्यस्थितीत जेवढा कचरा उपलब्ध होईल तेवढाच निविदाकार यांना स्वीकारणे बंधनकारक राहील. तसेच निविदाकार यांचे बेसिक ऑफ मधील अट क्र.१० अन्वये प्राप्त होणारा निधी हा मनपा कडेस जमा होईल व त्यावर मनपाचे नियंत्रण राहील. तो निविदाकार यांचेकडे प्रत्यक्ष जमा होणार नाही.

तसेच मनपाचे आरोग्य विभागाकडेस असलेली वाहने अपुरी असुन ती वारंवार नादुरूस्त होतात, नादुरूस्त असतात. मनपा कडेस बाराव्या वित्त आयोगाचा निधी उपलब्ध असल्याने आरोग्य विभागासाठी वाहने खरेदी करणे आवश्यक आहे, त्यासाठी सदर निधीतुन आवश्यकते प्रमाणे वाहने खरेदी करणेसाठी शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी. आरोग्य विभागासाठी वाहने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी देणेत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.शिंदे द.बा.

अनुमोदक : मा.सौ.दिघे वि.रा.

ठराव सर्वानुमते मंजुर.

मा.स्थायी समिती सभा क्रमांक १४ दि.२२-०१-२००८

ठराव क्रमांक १

ठराव : सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार मागील सभा दिनांक ७-१-२००८ ठराव क्रमांक १३ मधील " बी.ओ.टी. तत्वावर प्राप्त झालेली एकमेव अशी हायड्रोएअर टेक्नोटिक्स (पी.सी.डी.) लि.बेलापूर , नवि मुंबई यांचे निविदास मनपाने प्रसिध्द केलेल्या निविदेमधील मुळ अटी व शर्तीनुसार मंजुरी देण्यांत येत आहे. " ऑफिस रिपोर्ट मंजुर " हे चुकीने ठरावात नोंद घेतलेले वाक्य वगळून त्या ऐवजी " बी.ओ.टी.तत्वावर प्राप्त झालेली एकमेव अशी हायड्रोएअर टेक्नोटिक्स (पी.सी.डी.) लि.बेलापूर , नवि मुंबई यांचे निविदास मनपाने प्रसिध्द केलेल्या निविदे मधील मुळ अटी व शर्ती नुसार मंजुरी देण्यांत येत आहे. त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी. " तथापि कंत्राटदारास वार्षिक रूपये १ /- (एक) प्रति चौरस मीटर नुसार ३० (तीस) वर्षा करीता मनपाची बुरूडगांव सर्व्हे नं. ३४ पैकी सहा (६) एकर जागा देण्यांत यावी या प्रमाणे ठराव क्र.१३ दिनांक ७-१-२००८ रोजीच्या ठरावामध्ये

समावेश करून मा.स्थायी समिती सभा दिनांक ७-१-२००८ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्त कायम करण्यांस मंजुरी देण्यांत येत

सुचक : मा.सौ.मोरे स.दि.

अनुमोदक : मा.श्रीमती.दिघे वि.रा.

ठराव सर्वानुमते मंजुर.

त्यानुसार दिनांक २३-०१-२००८ रोजी वैद्यकिय आरोग्याधिकारी , शाखा अभियंता ( घनकचरा व्यवस्थापन ) मुख्य स्वच्छता निरिक्षक, यांनी इचलकरंजी येथे हायड्रोएअर टेक्नोटिक्स (PCD) लि. यांच्या प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी केली. प्रकल्प उभारण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आले होते. परंतु प्रत्यक्ष प्रकल्प सुरू झालेला नव्हता. तद्नंतर दि.२५-०१-२००८ रोजी अहमदनगर महानगरपालिका व हायड्रोएअर टेक्नोटिक्स (PCD) लि. यांच्या मध्ये मा.स्थायी समिती दि.०७-०१-२००८ ठराव क्र.१३ मध्ये स्थायी समिती दि.२२-०१-२००८ ठराव क्र.१ नुसार केलेल्या फेरबदला प्रमाणे करारनामा करण्यात आला.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत (BOT ) बांधा वापरा व हस्तांतर खत निर्मिती प्रकल्पाच्या , करारनाम्याच्या अनुषंगाने श्री.दिप चव्हाण,नगरसेवक यांचा दि.२८-०२-२००८ चा अर्ज , श्री.किशोर डागवाले , सभागृह नेते, श्री.कैलास गिरवले, नगरसेवक यांचा दि.०३-०३-२००८ चा अर्ज, सौ.सुनिता मुदगल, नगरसेविका, स्थायी समिती सदस्य व इतर यांचा दि.२९-०२-२००८ चा अर्ज यांच्या अनुषंगाने सदरच्या करारनाम्याची तसेच मुळ संचिकेची छाननी केली असता सदरचा प्रकल्प उभारणे बाबतची कार्यवाही ही सन २००३ पासुन चालु असल्याचे दिसुन येते. याबाबत वारंवार निविदा मागविण्यात आल्या आहेत. व त्या अनुषंगाने महानगरपालिकेचे विविध ठराव झालेले आढळुन येतात. निविदेस मिळणारा प्रतिसाद पाहता वारंवार फेर निविदा कराव्या लागल्याचे दिसुन येते. सदरचा प्रकल्प हा नागरी घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने तात्काळ होणे गरजेचे असल्याने सन २००७ मध्ये फेर निविदा मागविण्यात येवुन त्यावर मा.स्थायी समितीच्या ठरावाप्रमाणे दि.२५-०१-२००८ रोजी करारनामा झालेला आहे. याबाबत प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने करारनाम्यावर मा.महासभेत साधक बाधक चर्चा घडुनच संबंधित एजन्सी मे.हायड्रोएअर टेक्नोटिक्स (PCD) लि.बेलापुर , नवि मुंबई यांना कार्यारंभ आदेश देणे योग्य राहील. तोपर्यंत यापुढील संबंधित कार्यवाहीस स्थगिती देणे योग्य राहील. सबब प्रकरण मा.महासभेसमोर ठेवणे योग्य. मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सदर प्रकरणा बाबत " A " नुसार कार्यवाही करावी.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, " नगरसचिव महासभेपुढे घेणे "

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) , मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह व स्थायी समितीत पारित झालेल्या दोन ठरावासह तसेच अटी व शर्तीसह अंतिम निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

## अटी व शर्ती :-

१. अहमदनगर महानगरपालिकेमार्फत दैनंदिन शहरातून गोळा कचरा प्रकल्पाच्या ठिकाणी नियमितपणे स्वखर्चाने वाहतूक करुन देण्यात येईल. मात्र महानगरपालिका कर्मचारी संप, संचारबंदी, पाउस, पूर, भूकंप इ. नैसर्गिक तसेच आपतकालिन परीस्थिती किंवा इतर काही महत्वाच्या कारणांमुळे महानगरपालिका शहर हद्दीत गोळा होणा-या कच-याची वाहतूक महानगरपालिकेच्या बुरुडगाव स.नं. ३४ (पैकी) या कचरा डेपोच्या जागेवर करु शकणार नाही.

२. प्रकल्पासाठी लागणारी आवश्यक सुविधा, पाणी, वीज मनपा उपलब्ध करुन देईल. सदर प्रकल्पासाठी दररोज वापरात येणारे वीज व पाणी कनेक्शन वापरण्याच्या खर्चापोटी येणारे बील नियमाप्रमाणे सदर खाजगी संस्थेला स्वतःभरावे लागेल.

३. खाजगी संस्थेने प्रकल्प उभारणीसाठी लागणा-या एकूण जागेच्या क्षेत्रफळाचा उल्लेख करावा मात्र प्रत्यक्ष प्रकल्पासाठी एकूण किती जागा द्यावयाची आहे त्याबाबत महानगरपालिका निर्णय घेईल.

४. अहमदनगर महानगरपालिका या प्रकल्पासाठी लागणारी जागा भाडेपट्टीवर सदरचे संस्थेस उपलब्ध करुन देईल. त्यासाठी महानगरपालिका नियमाप्रमाणे जागेचे भाडे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस १५ एप्रिलपर्यंत भरणे सदर संस्थेस बंधनकारक राहिल.

५. सदर खाजगी संस्थेस प्रकल्पापासून मिळणा-या उत्पन्नावर मनपास रॉयल्टी भरावी लागेल व रॉयल्टीची रक्कम (टक्केवारी) टेंडरमध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

६. सदर संस्थेला भाडेपट्टी व रॉयल्टी भरणेस उशीर झाल्यास बँक दराने व्याज आकारले जाईल व सदरची रक्कम दंडापोटी महानगरपालिकेमध्ये भरावी लागेल.

७. सदर प्रकल्पावर निर्माण झालेल्या उत्पन्नाची (खत / उर्जा / बायोगॅस) व उपपदार्थाची विक्री व विल्हेवाट सदर खाजगी संस्थेने स्वतः स्वखर्चाने करावयाची आहे.

८. सदर खाजगी संस्थेने महानगरपालिकेकडे करारनामा सोबत बिनव्याजी अनामत रक्कमपोटी रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) भरणे आवश्यक आहे. सदर बिनव्याजी अनामत रक्कम महानगरपालिकेकडे प्रकल्प चालविला जाणा-या कालावधीपर्यंत राहिल.

९. सदरचे प्रकल्पासाठी दैनंदिन लागणारा संपूर्ण भांडवली खर्च व प्रकल्प चालविण्यासाठी दररोजचा देखभाल खर्च स्वतः सदर खाजगी संस्थेला करावा लागेल.

१०. सदर प्रकल्प उभारण्यासाठी व भविष्यकाळात प्रकल्प चालविण्यासाठी लागणारा निधी, आवश्यक यंत्रसामुग्री, मनुष्यबळ, वाहन इ. सदरचे खाजगी संस्थेला स्वत: उपलब्ध करावा लागेल त्यासाठी अहमदनगर महानगरपालिका कुठलेही सहकार्य व कुठलेही प्रकारचे अर्थसहाय्य करणार नाही किंवा जामिनदार राहणार नाही. अथवा महानगरपालिकेची वास्तू, आरक्षित जमिन सदरचे प्रकल्पासाठी तारण ठेवणार नाही.

११. सदरचा प्रकल्प उभारणे व चालविण्यांची कालमर्यादा किमान १५ (पंधरा) वर्ष राहील.

१२. अहमदनगर महानगरपालिकेने दैनंदिन पुरवठा केलेल्या कच-याचे पृथ:करण (ओला व सुका) सदर खाजगी संस्थेने करावयाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत प्रक्रिया न केलेल्या घनकच-याचे भूमी भराव करण्यात येवू नये. फक्त टाकाउ व प्रक्रियेनंतरचा निरुपयोगी कचरा किंवा घातक कचरा तेवढा भूमीभरावास्थळी टाकता येणार आहे. पुर्ननिर्मितीयोग्य कच-याची विल्हेवाट अलगपणे लावावी.

१३. सदर खाजगी संस्थेने कामाबाबतची ऑर्डर मंजूर झाल्यावर योग्य त्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल व एक महिन्याच्या आत (३० दिवसात) सदर प्रकल्पाची उभारणी करुन प्रकल्प चालू करावा लागेल.

१४. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० च्या अंमलबजावणीचे काटेकोर पालन सदरचे संस्थेस करावे लागेल.

१५. प्रकल्पाची उभारणी व प्रकल्प चालविण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, यांचेकडील आवश्यक ते प्राधिकार प्रमाणपत्र (ऑथोरायझेशन), ना हरकत दाखल (परवाना), संमतीपत्र, परवानग्या घेण्याची तसेच मिळालेल्या प्रमाणपत्राचे (ऑथोरायझेशनचे) नुतनीकरण दरवर्षी करुन घेण्याची व आवश्यक नोंदवही ठेवून अहवाल व कागदपत्र सादर करणेची सर्व जबाबदारी सदर खाजगी संस्थेची राहील. त्यासाठी आवश्यक ते सहकार्य महानगरपालिका करेल. त्याचप्रमाणे प्रकल्पासाठी नियमानुसार वेळोवेळी जे तंत्रज्ञान अद्ययावत करावे लागेल. त्याचीही जबाबदारी सदर खाजगी संस्थेची राहिल.

१६. सदर खाजगी संस्थेने घातक व जैव वैद्यकिय कचरा वगळून सर्व नागरी कचरा स्विकारायला लागेल. देवू केलेला सर्व कचरा स्विकारु शकत नसल्यास शासन निर्णयानुसार दंड आकारण्यात येईल.

१७. प्रकल्पाच्या ठिकाणी वापरात येणारे आवश्यक घटक व मिश्रण यापासून सदरचे परिसरातील रहिवासी, नागरिकांना त्रास होता काम नये. तसेच सदर परिसरातील हवा, प्रदुषण व भुगर्भातील पाणी प्रदुषण तसेच सदरच्या प्रकल्पामुळे रोगराई न पसरण्याची काळजी घेणे सदर खाजगी संस्थेला बंधनकारक राहिल.

१८. सदर खाजगी संस्थेकडे कचरा डेपो पासून ५०० मीटर परिघ परिसरातील जमिनखालील विहीर व बोअरमधील पाण्याची जैविक व रासायनिक नमुना तपासणी करणेची कार्यवाही दरवर्षी तीन महिन्यातून एकदा शासकीय अधिकृत प्रयोगशाळेकडून करुन घेण्याची जबाबदारी राहील.तसेच जल,वायू व जमीन प्रदुषण होवू नये याबाबत काळजी घेणे सदर संस्थेस आवश्यक आहे.

१९. पावसाळयामध्ये प्रकल्पासाठी साठवणूक केलेल्या कच-यावर पाणी पडून वाहणा-या पाण्याची योग्य प्रकारे विल्हेवाट संबंधीत संस्था यांना करावी लागेल.तसेच भुमिगत जलप्रदुषण होणार नाही याची सर्व जबाबदारी सदर खाजगी संस्थेची राहील.

२०. सदरच्या प्रकल्पामुळे आसपासचे,आजूबाजूचे शेतकरी,रहिवासी,व्यवसायिक व सदरचे प्रकल्पामध्ये काम करणारे कर्मचारी यांना कुठल्याही प्रकारची जिवित हानी,इजा,भरपाई नुकसान अथवा कोर्ट दावे झाल्यास त्यांनी हरकत घेतल्यास अहमदनगर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.त्याची सर्व जबाबदारी सदर खाजगी संस्थेची राहिल.

२१. सदर प्रकल्पासाठी आवश्यक कर्मचा-याची नेमणूक करणे,प्रचलित नियमानुसार त्यांचे सेवाशर्ती ठरविणे,सदर प्रकल्पाच्या मुदत कालावधीत किंवा नंतर सदर प्रकल्पामध्ये काम करणा-या कर्मचा-यांची सर्व जबाबदारी सदर खाजगी एजन्सीवर राहील.सदर खाजगी संस्थेच्या सेवेतील कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी वेतन,भत्ते किंवा इतर रकमेबाबत मनपाचा काहीही सबंध राहणार नाही.

२२. सदर प्रकल्पामध्ये काम करणा-या कर्मचा-यांना आवश्यक प्रोटेक्टिव्ह एक्विपमेंट उदा.मास्क,हॅडग्लोज,गमबुट,गॉगल इत्यादी सदर खाजगी एजन्सीने पुरवावे लागेल. कर्मचा-यांची नियमीत वैद्यकीय तपासणी करणे देखभाल करणे,आवश्यक सुविधा देणे व इतर सर्व जबाबदारी सदर खाजगी एजन्सीवर राहील.

२३. नैसर्गिक आपत्ती,उदा.आग,पाणी ,पाउस,पूर,भुकंप इ.व इलेक्ट्रीक शॉर्टसर्कीट या कारणांमुळे सदर प्रकल्पाचे काही नुकसान झाल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.यासाठी आवश्यक वाटल्यास सदर खाजगी एजन्सीने स्वतः विमा करुन घ्यावा लागेल.

२४. सदर प्रकल्पाच्या कालावधी दरम्यान प्रकल्पाची पाहणी निरिक्षण,निर्मीती अहवाल सदर खाजगी संस्थेकडून अहमदनगर महानगरपालिकेस द्यावा लागेल व मनपाचे अधिकारी कधीही पाहणीसाठी येतील.

२५. सदर खाजगी संस्थेला कामाबाबतची ऑर्डर मंजूर झाल्यावर योग्य त्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल व १ महिन्याच्या आत (३० दिवसात ) सदर प्रकल्पाची उभारणी करुन प्रकल्प चालू करावा लागेल.

२६. सदर खाजगी संस्थेला भाडेपटटीवर उपलब्ध करुन दिलेल्या जागेत मनपा अहमदनगर यांचे लेखी परवानगीशिवाय कुठल्याही प्रकारचे बांधकाम ,दुरुस्ती अथवा फेरबदल करता येणार नाही,किंवा सदर जागेचा पोटहिस्सा करुन भाडयाने देता येणार नाही.

२७. सदर खाजगी एजन्सीचे काम असमाधानकारक वाटल्यास किंवा अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास सदर खाजगी एजन्सीबरोबर महानगरपालिकेने केलेला प्रकल्प करारनामा कुठल्याही क्षणी रद्य करण्याचा अधिकार एक महिन्याची आगाउ नोटीस देवून मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांनी राखून ठेवीला आहे.तसेच प्रकल्प बंद पडल्यास सदरच्या खाजगी संस्थेस महानगरपालिकेमार्फत कुठल्याही प्रकारची भरपाई दिली जाणार नाही.

२८. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी व परिसराची साफसफाई ,देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी सदर खाजगी संस्थेची राहील.तसेच प्रकल्पाच्या ठिकाणी व परिसरामध्ये वृक्ष लागवड ग्रीन बेल्ट करण्याची जबाबदारी सदर खाजगी संस्थेची राहिल.

२९. सदर प्रकल्पाच्या अटी व शर्तीनुसार मुदत कालावधी संपल्यानंतर सदर खाजगी एजन्सी प्रकल्प चालविण्याकरीता इच्छुक असल्यास महानगरपालिका त्यावर विचार विनिमय करुन निर्णय घेईल.

-- * --

चर्चा :

मा.श्री.दिप चव्हाण :- हा विषय सभागृहापुढे येवू शकत नाही. विषय का आणण्यांत आलेला आहे. ४ महिन्यापुर्वी स्थायी समितीत ठराव झाला आहे. आता हा ठराव कशासाठी आलेला आहे.

यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, करारनामा, ठराव, मा.सदस्यांचा विरोध इत्यादी प्रश्नावर मा.आयुक्त सो, यांचेकडे ठेवला असता त्यांचे सूचनेप्रमाणे मा.सभेपुढे साधक-बाधक चर्चेसाठी ठेवण्यांत आलेला आहे.

मा.महापौर :- डी.पी.आर मंजूर असल्याने शासन अनुदान देण्यार नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- ३० वर्षाचा करार करण्याचा अधिकार आहे काय ? प्रशासनाने केलेली ही चूक आहे. वर्क ऑर्डर का देण्यांत आलेली नाही.

परंतु महासभेपुढे प्रस्ताव व्हावा असे सांगितलेवरुन वर्क ऑर्डर दिलेली नाही. असा खुलासा करण्यांत आला असता अशा प्रकारे जबाबदारी महासभेवर ढकलण्याचा विचार आहे. व हा आयुक्तांचा अधिकार आहे.

डी.पी.आर.मंजूर झालेला असल्यामुळे ऑफिसरिपोर्ट महानगरपालिका देवू शकत नाही.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, डी.पी.आर.शासनाने मंजूर केलेला आहे. यावर अनुदान मिळणार नाही. सभागृहा पुढे हा विषय आणण्याची आवश्यकता होती काय.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी नाही असे सांगितले. व यास ४ महिन्यांचा कालावधी झालेला आहे. १ महिन्यांत निविदा रद्द होवू शकते.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, याला सभागृहाची काय मंजूरी पाहिजे. याबाबतीत करारनामा संपूर्ण झालेला आहे. वर्क ऑर्डर दिलेली नाही. या सभेपुढे हा विषय येण्याचे कारण नाही. १ महिन्यानंतर वर्क ऑर्डर देण्याची जबाबदारी आहे ती दिलेली आहे काय.

यावर मा.उपायुक्त यांनी सागितले की, सदरची कार्यवाही मा.आयुक्त यांचे निर्देशानुसार झालेली आहे.

उपमहापौर श्री.सुळ :- बी.ओ.टी. तत्वावर केल्यामुळे अनुदान देणे शक्य होणार नाही. मा.आयुक्त यांना अटी शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार आहे.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, सेक्शन ५३ प्रमाणे त्यांनाच अधिकार आहेत.

आयुक्त यांनी सांगितले की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) नुसार आयुक्तांस महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिका मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, भाडयाने देता येईल त्यास महानगरपालिकेची मंजूरी आवश्यक आहे.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, यांचा कालावधी कोणी ठरविला आहे. ३० वर्षाच्या कालावधीने देण्याचा अधिकार दिला आहे काय ? तेंव्हा सदरचा नविन विषय आणावा व कलम ७९ चे तरतुदी प्रमाणे कार्यवाही करावी. व याबाबतची जबाबदारी निश्चित करावी. अन्यथा आमचा विरोध राहील.

मा.श्री.कैलास गिरवले :- वेळोवेळी अटी बदलत गेल्या. अटी शर्ती बदलण्यासाठी स्थायी समितीने विषय महानगरपालिका सभेसमोर का आला नाही. यासाठी सभेने मंजूरी दिलेली होती. दरवर्षी दीड कोटी अनुदान प्राप्त होते. ३० वर्षाच्या प्रकल्पास ४५ कोटी महानगरपालिकेचे नुकसान आहे. सर्व खर्च संस्था करणार आहे. प्रशासन काय विचार करते याबाबत छाननी समितीचे निर्णयानुसार प्रशासन जबाबदार कोणतेही अनुदान मिळणार नाही. ही दुरुस्ती रद्द करावी व आयुक्त यांना अधिकार देण्यांत यावेत.

मा.श्री.अशोक कानडे :- घनकचरा खत निर्मिती प्रकल्प संदर्भामध्ये आयुक्त यांनी अभ्यास केला असेल तर विषय चुकीचा झाला असे मान्य आहे काय ? याबाबत आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात योग्य तो निर्णय घ्यावा असा ठराव करावा.

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- सभागृहापुढे विषय आलेला आहे. तो विषय मार्गी लावावा अशी विनंती करतो.

मा.श्री.अभय आगरकर :- सदरचा दस्तऐवज एकांकी झालेला आहे. तो सभागृहास बदलण्याचा अधिकार आहे किंवा नाही ? बदल करण्याचा अधिकार महासभेचा आहे. लिगल ॲग्रीमेंट व्हॉयलेट करता येईल काय हा निर्णय आयुक्त यांनी करावा. जाचक अटी काढुन घेवून या बाबतचा कालावधी १५ वर्षापर्यंतचा करावा.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, कालावधी ३० वर्षांचा करावा. फक्त अनुदान द्यावयाचे नाही. अनुक्रम नं.२१ अनुदान रद्द करावे. या करीता जामिन बँक गॅरंटी महानगरपालिका देणार नाही. या अटीवर आयुक्त यांनी पुढील कार्यवाही करावी.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट व सभेमध्ये झालेल्या साधक -बाधक चर्चेनुसार ठरविण्यात येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ क व ड नुसार मा.आयुक्तांनी हायड्रोएअर टेक्नॉनिक्स प्रा.लि.यांना ६ एकर जागा चालु बाजार दरानुसार भाडे आकारणी करून ३० वर्षासाठी " बांधा, वापरा व हस्तांतरण " या तत्वावर देण्यात यावा.

" घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल " हा मा.शासनाकडे मनपाने सादर केला असता त्यास दि.२८-०१-२००७ रोजी " बांधा,वापरा व हस्तांतरण " तत्वावर घनकच-याची विल्हेवाट करावी या अटीवर मंजुर करण्यात आला आहे. सबब मनपा व कंत्राटदार संस्था यांच्यातील करारनाम्यातील अटी शर्ती क्रमांक २१,२२,२३ पैकी अट क्रमांक २१ मध्ये केंद्र व राज्य सरकार कडुन प्राप्त होणारे अनुदान हे कंत्राटदारास मनपा अदा करणार नाही. त्यावर ठेकेदाराचा कोणताही अधिकार असणार नाही. याप्रमाणे करारनाम्यातील अट क्रमांक २१ मध्ये बदल मा.आयुक्त यांनी करावेत. त्या अनुषंगाने अट क्र.२२ व २३ ही रद्य करण्यात यावी. तसेच अट क्र.४४ मध्ये व इतर आवश्यक ठिकाणी या अनुषंगाने बदल करण्यात यावा.

या करारनाम्यातील अट क्र.६४ मध्ये नमुद केलेले लवादाबाबतचा मुद्या / अट ही पुर्णतः रद्य करण्यात येत आहे. व त्यानुसार आवश्यक त्या ठिकाणी करारनाम्यात लवादा संबंधीचा सर्व मजकुर हा वगळयात यावा, रद्य समजण्यात यावा.

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २ दिनांक २२-०१-२००८ मधील ठरावात देखील उपरोक्त प्रमाणे दुरूस्ती करण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी.

खत प्रकल्पा व्यतिरिक्त दहा एकर जागेमध्ये तसेच भविष्यातील महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार " सॅनिटरी लँडफिल साईट " नियमाप्रमाणे प्रकल्प उभारणी बरोबरच विकसित करून पुर्ण करणे व कराराची मुदत ३० वर्षापर्यंत तिची देखभाल दुरूस्तीची जबाबदारी कंत्राटदार यांची असेल. सदर बाबत मनपा कुठलेही चार्जेस कोणत्याही स्वरूपात अदा करणार नाही. याचे पुर्ण उत्तर दायित्व कंत्राटदाराचे राहील.

कंत्राटदाराच्या कोणत्याही कर्ज व तत्सम बाबीस मनपा , हमी , जामीनदार राहणार नाही. सबब उपरोक्त सर्व बदलासह व अनुषंगिक बदल करणेस्तव करारनाम्यातील अट क्रमांक ५६ नुसार मा.आयुक्त यांना सदर प्रकल्पाबाबत करारनाम्यामधील अटी व शर्ती मध्ये फेरबदल करण्याचे अधिकार आहे. याप्रमाणे कार्यवाही करणेस्तव मा.आयुक्तांना निर्देशित करण्यात येते.

सुचक : मा.श्री. अशोक कानडे
अनुमोदक : मा.श्री. भगवान फुलसौंदर
ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-x
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दिनांक :२५-०६-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : घरोघरी कचरा संकलन करणेसाठी घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी नव्याने उपलब्ध होणा-या कचरा वाहनांसाठी वाहन चालकांच्या नेमणुकी बाबत ऑफिस रिपोर्ट.(कंत्राटी पध्दतीने )

--*--

प्रस्तावाचा मजकुर : मा. आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडून मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार (डि.पी.आर.) १२ वा वित्त आयोग निधी मधून (घन कचरा व्यवस्थापनासाठी) घरोघरी जावून कचरा संकलन करणेकामी वाहन खरेदी करण्यासाठीच्या प्रस्तावाला मिळालेल्या मंजूरीनुसार अहमदनगर महानगरपालिका मोटार वाहन विभागामार्फत वाहन खरेदीच्या प्रक्रीया प्रचलित नियमानुसार करण्यात येत असून सदर वाहन लवकर उपलब्ध होणार आहे.

तथापि, नव्याने उपलब्ध होणा-या एकूण ३० वाहन (टाटा एस.आर. १५ व टाटा ७०९ १५) व दोन कंटेनर प्लेसर साठी वाहनचालकांची आवश्यकता भासणार आहे. कारण महानगरपालिका अस्थापनासुचीवरील वाहन चालकांची संख्या अपूरी पडत आहे असे दिसते कारण दिनांक १४-०२-२००८ रोजी या संदर्भात सविस्तर प्रस्ताव आरोग्य विभागामार्फत प्रस्ताव सादर केलेला असता मा. उपायुक्त कर यांचे आदेशान्वये सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी मोटार व्हईकल विभागाकडे दिनांक २६/०२/२००८ रोजी पाठविण्यात आलेले आहे. व सदर विभागाकडून वाहन चालक उपलब्ध नाही. असे सांगण्यात आले. वाहन खरेदीच्या प्रस्तावाला मंजूरी देतांना मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडील खालील अटी घालण्यात आलेले आहेत.

अट क्रमांक :- (ड ) बाबत - सदर वाहनाकरीता नव्याने वाहन चालकाचे पद मंजुर करण्यात येणार नाही. सध्या अस्तित्वात असलेल्या महानगरपालिका आस्थापना सुचीवर वाहन चालकांची पदे मंजुर असुन नव्याने प्राप्त होणा-या वाहनांकरीता सदर वाहन चालक उपलब्ध होणार नाही व नव्याने वाहन चालकांचे पदांना शासनाकडून मंजुरी दिली जाणार नाही.असे नमुद केलेले असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे आवश्यक वाटते.

तथापि, महाराष्ट्र शासन मान्य महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ (मेस्को) यांचे कडील उपलब्ध वाहन चालकांच्या नेमणूक करणे उचित वाटते. कारण शासनाचे मान्यता असल्याने टेंडर काढण्याची आवश्यकता नाही. मानधनाने ठरवण्याची आवश्यकता नाही. वाहन चालक अनुभवी असल्याने काय सुरळीतपणे होवू शकते त्यामुळे वाहनांचा वापर व देखभाल योग्य रितीने घेऊन म.न.पा. मार्फत नागरिकांना चांगल्या सेवा देता येवू शकते. या कारणास्तव पुणे येथील घोरपडीमध्ये असलेल्या मेस्को कार्यालयाशी दुरध्वनी क्रमांक २६३३०६६४ वरीष्ठ व्यवस्थापक प्रवर्तक व प्रशासनची वि.गो. जोशी यांच्याशी चर्चा करुन सदर संस्थेच्या वाहन चालक पुरविणेसंदर्भात असलेल्या अटी व शर्ती इत्यादी नियमावली मार्गदर्शनासाठी दि. ०३/०४/२००८ रोजी मागवून घेण्यात आली.

**सदर माहिती पत्रकातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे -**

१) मेस्कोमार्फत वाहन चालक पुरविण्याबाबत अटी व शर्ती खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत-

(अ) कंत्राटी पद्धतीने मासिक वेतनाप्रमाणे वाहन चालक पुरविले जातील. रोजंदारीवर वाहन चालक पुरविले जात नाहीत.

(ब) वाहन चालकासाठी कमीत कमी एक वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राटाचा करार करावा लागेल.

(क) वाहन चालकांना दरवर्षी पगारी ५२ दिवस आठवडे ऑफ, २१ दिवस रजा व ०४ दिवस राष्ट्रीय सुट्या लागू आहेत. त्या दिवशी बदली वाहन चालक पुरविला जाणार नाही. तसेच तो आजारपणामुळे अथवा अन्य काही कारणास्तव गैरहजर झाल्यास त्याचा बदली दुसरा वाहन चालक पुरविला जाणार नाही.

(ख) वाहन चालकाची कामाची पाळी ०८ तासांची राहील.

(ग) वाहन चालकाने ०८ तासाच्यावर कार्य केल्यास त्याला Over Time च्या दरात मोबदला द्यावा लागले.

(घ) वाहन चालकाने परगावी जाऊन कार्य केल्यास व तेथे रात्री मुक्काम केल्यास त्याकरिता त्याला दररोज रु. १००/- च्या दराने दैनंदिन अतिरीक्त भत्ता द्यावा लागेल. हा भत्ता उपरोक्त (ग) मध्ये नमूद केलेल्या Over Time देणे आवश्यक आहे.

२. वाहन चालकासाठी मासिक दर पत्रक व मसुदा करारनामा या पत्रासोबत जोडलेला आहे.

<u>झोन १ मधील चालकाचा दरमहिन्याचा भत्ताचा तपशील खालीलप्रमाणे</u>

| **नं.** | **तपशील** | **चालक** |
|---|---|---|
| **अ)** | **पगार** | |
| १) | मूळ (कमीत कमी भत्ता) | ३७५०.०० |
| २) | व्हि.डी.ए.(महत्वाचा भत्ता) (नोट १ पहा) | ६४७.८० |
| | डी (एस.इ.आर. १ + २) | ४३९७.८० |
| ३) | एस.इ.आर. १ व २ घरभत्ता @ १० %. | ४३९.७८ |
| ४) | एस.इ.आर. १ व २ वॉशिंग @ १० % . | ४३९.७८ |
| ५) | **एकूण** | **५२७७.३६** |
| **ब)** | **स्टॅच्युटोरी कंप्लाईन्सेस** | |
| ६ | एस.इ.आर. १ व २ ई.पी.एफ. @ १२ %. | ५२७.७४ |
| ७ | एस.इ.आर.१ व २ ई.डी.एल.आय. (पी.एफ.) @ १.११ %. | २१.९९ |
| ८ | एस.इ.आर. १ व २ ए.डी.एम. खर्च पी.एफ. @ १.११ % . | ४८.८२ |
| ९ | इंशुरन्स डब्लू. सी. ए. खाली | ३०.८७ |
| १० | एस.इ.आर. १ व २ बोनस @ ८.३३ %. | २९१.६७ |
| ११ | एस.इ.आर. १ व २ ग्रॅच्युटी @ ४.८१ %. | २११.५३ |
| १२ | महाराष्ट्र लेबर वेलफेअर फंड | ६.०० |
| १३ | सर्व्हिस टॅक्स (नोट ५ पहा) | |
| १४ | **एकूण** | **११३८.६२** |
| | **<u>वेगळे चार्जेस</u>** | |
| १५ | २१ दिवस इ.एल. व ०४ राष्ट्रीय सुट्या - २५ दिवसांचा पगार | ३६६.४८ |
| १६ | **एकूण** | ३६६.४८ |
| **डी** | **मेस्को अर्निंग** | |
| १७ | एस.इ.आर. ५, १४, व १६ सर्व्हिस चार्जेस @ 14 % | ९४९.४८ |
| **१८** | **एकूण** | **९४९.५४** |
| **१९** | **एकूण (एस.इ.आर. ५, १४, १६ व १८)** | **७७३२.०१** |
| **२०** | **दर प्रति दिन प्रति मानसी** | **३२२.१७** |

## झोन १ मधील चालकाचा दरमहिन्याचा भत्ताचा तपशील खालीलप्रमाणे

| नं. | तपशील | चालक |
|---|---|---|
| **अ)** | **पगार** | |
| १) | मूळ (कमीत कमी भत्ता) | ३७५०.०० |
| २) | व्हि.डी.ए.(महत्वाचा भत्ता) (नोट १ पहा) | ६४७.८० |
| | डी (एस.इ.आर. १ + २) | ४३९७.८० |
| ३) | एस.इ.आर. १ व २ घरभत्ता @ १० %. | ४३९.७८ |
| ४) | एस.इ.आर. १ व २ वॉशिंग @ १० % . | ४३९.७८ |
| ५) | **एकूण** | **५२७७.३६** |
| **ब)** | **स्टॅच्युटोरी कंप्लाईन्सेस** | |
| ६ | एस.इ.आर. १ व २ ई.पी.एफ. @ १२ %. | ५२७.७४ |
| ७ | एस.इ.आर.१ व २ ई.डी.एल.आय. (पी.एफ.) @ १.११ %. | २१.९९ |
| ८ | एस.इ.आर. १ व २ ए.डी.एम. खर्च पी.एफ. @ १.११ % . | ४८.८२ |
| ९ | इंशुरन्स डब्लू. सी. ए. खाली | ३०.८७ |
| १० | एस.इ.आर. १ व २ बोनस @ ८.३३ %. | २९१.६७ |
| ११ | एस.इ.आर. १ व २ ग्रॅच्युटी @ ४.८१ %. | २११.५३ |
| १२ | महाराष्ट्र लेबर वेलफेअर फंड | ६.०० |
| १३ | सर्व्हिस टॅक्स (नोट ५ पहा) | |
| १४ | **एकूण** | **११३८.६२** |
| | **वेगळे चार्जेस** | |
| १५ | ५२ दिवस आठवडी सुट्टीचा पगार (५+१४/२६*५२/१२) | १०६९.३३ |
| १६ | २१ दिवस पी.एल. (1+2/30*21/12*2) चा पगार | ५१३.०८ |
| १७ | ४ दिवस पी.एल. (Ser 1+2/30*4/12*2) दिवसांचा पगार | ९७.७३ |
| १८ | **एकूण** | १६८०.१४ |
| **डी** | **मेस्को अर्निंग** | |
| १९ | एस.इ.आर. ५, १४, व १६ सर्व्हिस चार्जेस @ 14 % | ११३३.४६ |
| **२०** | **एकूण** | **११३३.४६** |
| **२१** | **एकूण (एस.इ.आर. ५, १४, १८ व २०)** | **९२२९.५७** |
| **२२** | **दर प्रति दिन प्रति मानसी** | **३०३.४४** |

## ३. उपरोक्त अटी व शर्ती

उपरोक्त अटी व शर्ती दरपत्रक व करारनामा आपणास मान्य असल्यास पुरवठा आदेश द्यावा हि विनती असे कळविले आहे.

## सदर महामंडळाची सेवा कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे आहे

१. सुरक्षा रक्षक पुरविणे.
२. बांधकाम व दुरुस्ती विभाग.
३. पेट्रोल पंप चालविणे.
४. वाहन चालक पुरविणे.
५. माजी सैनिक उत्पादन व प्रशिक्षण केंद्राव्दारे दर्जेदार सागवानी स्टील फर्निचर तयार करणे व शासनाने ठरविलेल्या दरात विक्री करणे.

६. माजी सैनिकांच्या अवलंबितासाठी सरकारमान्य शिवण व कर्तन शिक्षण देणे.

७. एकमेव अद्यवयात संगणकीकृत ऑफसेट प्रिंटींग प्रेस चालविणे.

८. टोल नाक्यावर पथकर वसुली.

**<u>सध्या सदर महामंडळाचे ग्राहक -</u>**

- ➢ भारत संचार निगम मर्या.- पुणे व कोल्हापूर
- ➢ महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ मर्या. - अकोला, सातारा, नाशिक, पोफळी अशी २५ ठिकाणे
- ➢ यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकॅडमी (यशदा)- पुणे
- ➢ महानगरपालिका- नांदेड व नागपूर.

तरी शासन मान्य महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ यांचेकडील वाहन चालकांची नेमणूकीमुळे माजी सैनिकांना न्याय मिळेल व म.न.पा.सुद्धा आपले कर्तव्य चोखपणे पार पाडून नागरीकांना चांगल्या प्रकारे सेवा उपलब्ध करुन देईल.

तथापि सदर कामी ३८ वाहन चालकांची (रिलीव्हर सह) आवश्यकता भासणार असून त्याकामी दरमहा खर्च व वार्षिक खर्च खालील प्रमाणे येणार आहे.

| | | दरमहा खर्च. | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| अ) | रिल्हीव्हर ड्रायव्हर. | ३,५०,७०२/- | ४२,०८,४२४/- |
| ब) | विदआऊट रिल्हीव्हर ड्रायव्हर. | २,९३,८१६/- | ३५,२५,७९२/- |

सदर मासिक पगारापोटी रक्कम ही मेस्को कंपनी पुणे येथे दरमहा वर्ग करावी लागेल.

तरी या कामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ४२,०८,४२४/- चे खर्चास मंजुरीस व पुढील कार्यवाहीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

बजेट तरतुद - सन २००८-२००९

खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे.

रु.३०,००,०००/-

झालेला खर्च - रु. निरंक.

सबब मुख्य स्वच्छता निरीक्षक व शाखा अभियंता यांचे सहीसह मा.महासभेपुढे ठेवणेकरीता आदेशार्थ सादर.

यावर वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचा अभिप्राय की, १२ व्या वित्त आयोग निधी मधुन उपलब्ध होणारा वाहनासाठी कंत्राटी पध्दतीने वाहन चालकांची नेमणूकी संदर्भात प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्य लेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव तथापि अंदाजपत्रकीय तरतुदी नुसार अधिक खर्च झालेस पुर्न नियोजन घेणे आवश्यक.

यावर मा.मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय की, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मासैम १०९९/४३९०/प्र.क्र.२४४/९९/०८ दिनांक १४ नोव्हेंबर २००२ अन्वये महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ पुणे यांचेकडुन वाहन चालक कंत्राटी पध्दतीने भरणेस व खर्चास मान्यतेस्तव सादर. सन ०८-०९ च्या तरतुदीतून खर्च करता येईल.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ " नुसार प्रस्ताव मा.महासभे समोर ठेवणे योग्य आहे. मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट वैद्यकिय आरोग्याधिकारी, मुख्यलेखापरिक्षक, मुख्यलेखाधिकरी, मा.उपायुक्त (कर) ,मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

चर्चा :

सुरुवातीस मेस्को मार्फत वाहन चालक नेमणे बाबत कंपनीचे अधिकारी यांनी माहिती व खुलासा केला. यासाठी एक्स सर्व्हीस मन आम्ही ड्रायव्हर म्हणुन लावतो व त्यांना ८ तास ड्युटी देतो असे सांगितले व त्यामध्ये आमच्या संस्थेमार्फत १४ टक्के कमिशन घेण्यांत येते असे सांगितले. यावर अनंत जोशी नगरसेवक यांनी सांगितले की, इतर संस्था सदरचे काम ५ टक्क्यांपर्यंत करतात.

मा.श्री.दिप चव्हाण :- महानगरपालिकेकडे निरनिराळया खात्याकडे चौकशी करुन ड्रायव्हरच्या किती जागा रिक्त आहेत ते पहावे. सदर कंपनीच्या अटी आणि शर्ती महानगरपालिकेला परवडतील काय ? यासाठी ७० ते ८० लाख रुपये खर्च करावयाचा आहे.

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- महानगरपालिके मध्ये काही बिगारी ड्रायव्हरचे काम करण्यांस तयार आहेत. अशा लोकांना यामध्ये संधी देण्यांत यावी असे सुचविले.

मा.श्री.मिलींद गंधे :- प्रस्ताव चांगला आहे.

मा.श्री.जोशी :- स्वच्छ शहर सुंदर शहर या करीता आम्ही या योजनेचे स्वागत करतो. या करीता खाजगी करण होत आहे तथापि कमीत कमी पगारावर किंवा मानधनावर ड्रायव्हर घ्यावे. देखभाल खर्च खाजगी संस्थेने करावा.

यावर आयुक्त यांनी सांगितले की, शहरातील जुना भाग खाजगी करणातुन काम करुन घेतल्यास मोठे काम चांगले होईल.

यावर मा.श्री.गंधे यांनी उपनगरातील कचरा संकलना करीता कॉन्ट्रॅक्ट देण्यांत यावे.

मा.श्री.शेख मुदस्सर :- ड्रायव्हर एजन्सी नेमन्यामध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच महानगरपालिके मधील कर्मचा-यांची पदोन्नती त्वरीत देण्यांत यावी.

यावर ८ दिवसांत निर्णय घेण्यांत येईल असे आयुक्त यांनी सांगितले.

मा.श्री.उडाणशिवे :- कचरा संकलन करण्यासाठी महानगरपालिकेने गाडया आणलेल्या आहेतच घरोघर कचरा गोळा करण्याचे काम आमच्या संघटने मार्फत चार वर्षापासुन करण्यांत येत आहे. आमचा अधिकार संपुष्टात येईल. आमच्या संघटनेतील ब-याच कामगारांनी सुवर्ण जयंती रोजगार योजनेतुन ड्रायव्हरचे ट्रेनिंग घेतले आहे. त्यामुळे नविन आलेल्या वाहनांवर आमच्या संघटनेतील कर्मचा-यांना काम दिल्यास आम्ही निम्म्या पैशामध्ये काम करण्यात तयार आहोत. यावर सहानुभूतीपुर्वक आमचा विचार करावा.

मा.श्री.मिलींद गंधे :- महानगरपालिकेने वाहने विकत घेतल्यामुळे कचरा संकलन आणि वाहतुक यामध्ये टेंडरची रक्कम कमी होवू शकते.

मा.महापौर :- खरेतर महानगरपालिकेने अशा प्रकारे गाड्या वाहने घ्यावयास नको होती परंतु आता घेतलेली आहेतच तेंव्हा या गाडयांचा वापर करुन टेंडर कॉल करु शकतो.

मा.श्री.अभय आगरकर :- मा.महापौर आपण आयुक्त व उपायुक्त या बाबतीत ५ ते ६ जणांची कमिटी करुन डिक्सशन करुन पर्याय ठेवावे व मार्ग काढावा.

यावर उपमहापौर सुळ यांनी सांगितले की, ड्रायव्हर भरती करणे हाच पर्याय आहे.

मा.श्री.आगरकर :- गाडया चालविण्या बाबत विचार करावा. अधिकारी व इंजिनियर यांचेबरोबर चर्चा करावी व सदरचा प्रश्न मा.आयुक्त साो, यांचेकडेस सोपवावा व त्यांनी महानगरपालिकेच्या हिताचा निर्णय घ्यावा. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत.

यावर उपमहापौर यांनी आयुक्तांनी निर्णय घ्यावा असे सांगितले.

--*--

**ठराव :** सदर प्रस्तावाबाबत झालेल्या साधक - बाधक चर्चेनुसार ठरविण्यात येते की, प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ (मेस्को) यांचे प्रतिनिधींनी मा.सर्वसाधारण सभेपुढे सांगितलेले दर जादा असल्याने व कामाचे तास केवळ आठ असल्याने कॉन्ट्रॅक्ट पध्दतीवर जाहिर निविदा मागविणेची कार्यवाही करण्यास हि सभा मंजुरी देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक : मा.श्री.शेख मुदस्सर

अनुमोदक : मा.श्री.किशोर डागवाले

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-x
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ८ दिनांक :२५-०६-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर प्रारूप विकास योजना ( वाढीव हद्द ) - महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रारूप विकास योजना (वा.ह.) प्रसिध्द करणे व कलम ३० अन्वये मा.शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे तसेच कलम २१, २८ व ३० अन्वये आवश्यक असलेल्या मुदतवाढी मंजुर करणेबाबत.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्र.एम.यु.बी / ११७३ /२०६६२ / प्र.क्र.५५/८९/ नवि-१६ दि.२९/६/९९ अन्वये अहमदनगर शहराची हद्दवाढ मंजूर करण्यात आली असून दि. १/७/१९९९ पासुन अंमलात आलेली आहे. सदर हद्दवाढीनुसार नव्याने हद्दीत समाविष्ट झालेल्या क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना तयार करण्याचा इरादा नगर परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६ दि.९/१०/१९९९ अन्वये जाहिर करण्यात आला.

सदर वाढीव हद्दीची विकास योजना तयार करणेकामी मा. उपसंचालक नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचे दि.२३/३/२००० च्या आदेशान्वये मा.सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांची "नगररचना अधिकारी " म्हणून नेमणूक केलेली असून मा.संचालक नगररचना, म.राज्य पुणे त्यांचे दि.१९/७/२००० चे आदेशान्वये तत्कालीन नगर परिषदेच्या आस्थापनेवर दि. १/८/२००० पासून विशेष घटकाची निर्मिती करुन विकास योजना विशेष घटक (वाढीव हद्द) हे कार्यालय कार्यान्वीत करण्यात आलेले आहे.

सदर कार्यालयाने दि. ५/९/२००२ रोजी विद्यमान जमिन वापर नकाशा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेला आहे. व त्यानंतर अधिनियमातील तरतूदीनुसार वेळोवेळी मा. शासनाकडून मुदतवाढी मंजूर करुन घेउन तयार केलेला प्रारुप विकास योजना आराखडा प्रसिध्द करण्यास महासभा ठराव क्र.७ दि.१७/५/२००६ अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून दि. २७ जुलै २००६ च्या राजपत्रात ती प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

प्रारुप विकास योजना (वा.ह) प्रसिध्दीकरणा नंतर हरकत / सुचना दाखल करण्याची ६० दिवसाची विहीत मुदत दि. २५/९//२००६ रोजी संपलेली आहे. सदर मुदतीत एकूण २४२ / हरकत/ सूचना अर्ज महानगरपालिकेकडे दाखल झालेले आहेत. तथापी मा. महासभेने ठराव क्र. ४ दि. ३/११/२००७ अन्वये हरकत/ सूचना दाखल करण्याची मुदत ही दि. ३०/११/२००७ पर्यंत वाढविलेली आहे. सदर वाढीव मुदतीत १७२ असे एकूण ४१४ इतके हरकत / सूचना अर्ज दाखल झालेले आहेत.

प्रारुप विकास योजना (वा.ह) संदर्भात दाखल झालेले हरकत/ सुचना अर्जधारकांना सुनावणी देणेसाठी गठीत करावयाच्या नियोजन समितीवर मा.शासनाने दि. ३/४/२००७ रोजी चार शासकीय सदस्यांची नेमणूक केलेली असून उर्वरित तीन स्थायी सदस्यांची नेमणूक मा. महापौरसाहेब यांनी दि. ३/९/२००७ रोजी केलीआहे.

अशारितीने दि. ३/९/२००७ रोजी अस्तित्वात आलेल्या नियोजन समितीने दि.२१/१/२००८ ते २४/१/२००८ या कालावधीत सर्व हरकत/ सूचना धारकांचे म्हणणे समक्ष ऐकून घेउन, प्रत्यक्ष स्थल निरीक्षण करुन दाखल झालेल्या कागदपत्रांची पहाणी करुन व कायदेशिर बाबींचे अवलोकन करुन हरकत/ सूचना अर्जावर निर्णय घेतलेला आहे. व त्यानूसार तयार केलेला योजनेचा आराखडा दि. ४/६/२००८ रोजी महानगरपालिकेकडे सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रारुप विकास योजना (वा.ह) आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम सन १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिध्द करणे व कलम ३० अन्वये मा.शासनाकडे मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

तसेच या विकास योजने संदर्भात महाराष्ट्र प्रोदशिक व नगररचना अधिनियमा प्रमाणे खालील कलमान्वये मुदतवाढी मंजूर करणे आवश्यकत आहे.

१ कलम २१ अन्वयेची मुदतवाढ :-

म.प्रा.व.न.र. अधिनियमाच्या कलम २१ अन्वये कोणतेही क्षेत्र महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर या क्षेत्राची ३ वर्षाच्या आत विकास योजना तयार करुन ती शासनास सादर करणे अनिवार्य असते तथापी या मुदतीत उपरोक्त विकास योजना शासनास सादर होउ शकली नाही. याकामी वेळोवेळी मुदतवाढी घेण्यात आलेल्या आहेत. कलम २१ अन्वयेची शेवटची मुदतवाढ दि. ३१/१२/२००७ पर्यंत घेण्यात आलेली आहे. तथापी याही मुदतीत सदर विकास योजना शासनास सादर होउ शकलेली नाही.

आता याबाबतची सर्व कायदेशिर कार्यवाही पूर्ण झालेली आहे. व लवकरच ही विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात येईल. त्यामुळे कलम २१ अन्वये दि. ३१/१२/२००७ ते ३०/१२/२००८ पर्यंत मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे.

२. कलम ३० अन्वयेची मुदतवाढ :-

प्रारुप विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर उक्त कायदयाच्या कलम ३० मधील तरतुदीनुसार ही विकास योजना प्रसिदधीच्या दिनांकापासून १२ महिन्याच्या आत किंवा वेळोवेळी दिलेल्या वाढीव मुदतीत शासनाकडे सादर करणे आवश्यक असते. मा. महासभेने या कलम ३० अन्वयेची शेवटची मुदतवाढ दि.२६/७/२००८ पर्यंत मंजूर केलेली आहे. तथापी विकास योजनेचे राहिलेले काम विचारात घेता ही विकास योजना दि. २६/७/२००८ पर्यंत शासनास सादर करणे शक्य होणार नाही. सबब या कलमान्वये देखील दि. २७/७/२००८ ते ३१/१२/२००८ या कालावधीसाठी मुदतवाढ घेणे आवश्यक आहे.

३. कलम २८ अन्वयेची मुदतवाढ :-

दि. ३/९/२००७ रोजी नियोजन समिती पुर्णपणे गठीत झाल्यानंतर उक्त कलमान्वये दोन महिन्यापर्यंत म्हणजेच दि. ३/९/०७ ते २/११/०७ अखेर नियोजन समितीने त्यांचा अहवाल नियोजन प्राधिकरणास सादर करणे आवश्यक आहे. परंतू नियोजन समितीने सदरचा अहवाल विहीत मुदतीत सादर न केल्यामुळे पुढील मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. नियोजन समितीने दि. ४/६/२००८ च्या पत्रान्वये त्यांचा अहवाल नियोजन प्राधिकरणास सादर केलेला आहे. त्यामुळे दि. ३/११/२००७ ते ५/६/२००८ पर्यंत मुदतवाढ घेणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

सोबत :- नियोजन समितीचा अहवाल.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित अहमदनगर प्रारूप विकास योजना ( वाढीव हद्द ) मंजुरीसाठी मा.महासभेकडे पाठविणेसाठी मान्यतेस्वव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा :**

मा.श्री.अनंत जोशी :- याबाबत आम्ही प्रशासनास यापुर्वीच पत्र दिलेले आहे. ते पत्र सभागृहात दाखविले. याबाबतीत मा.सदस्यांना पुरेसा वेळ मिळालेला नसल्यामुळे १५ दिवसाच्या नंतर पुढे याबाबत सभा आयोजित करावी असे सांगितले. यावर मा.श्री.गिरवले यांनी सदर विषयास अनुमोदन दिले.

मा.श्री.कृ.द. जाधव :- शहराचा विकास आराखड्यामुळे शहराच्या विकासाला चालना मिळालेली आहे. या विषया बाबतची टिप्पणी अभ्यासाकरीता १५ दिवसांनी सभा घेण्यांत यावी. तोपर्यंत या विषया बाबतची सर्व माहिती नगररचना विभागाने सर्व सदस्यांना झेरॉक्स करुन देण्याची व्यवस्था करावी.

शहरामध्ये एरोबिक्सच्या स्पर्धा भरविल्या जाणार आहेत त्याकरीता अहमदनगर महानगरपालिकेने या स्पर्धा आयोजना करीता स्पर्धा समितीला भरघोस अनुदान द्यावे व निधी द्यावा असे सभेचे वेळी सुचविले.

--*--

**ठराव :** अ) ठरविण्यात येते की, सभागृहात सदर विषयाबाबत झालेली साधक बाधकचर्चा व सन्माननीय सदस्य यांनी सदर विषयाची संपुर्ण माहिती घेण्याकरीता मागितलेला अवधी याचा विचार करता साधारणतः १५ दिवसानंतर सदर विषय घेवुन महासभा घेण्यात यावी.

ब) महासभेमध्ये झालेल्या सुचनेनुसार शहरामध्ये एरोबिक्सच्या राष्ट्रीय स्पर्धा भरविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी देण्यात येत आहे. सदरच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव
अनुमोदक : मा.श्री.अनंत जोशी
ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-xxx
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

## दिनांक २५/०६/२००८ रोजीचे सर्वसाधारण सभेची चर्चा :-

---*---

सभेसाठी गणपुर्ती होवुन सभा दुपारी १-१५ वां. सुरु झाली.

विषय क्रमांक : २ :- दुखवटयाचे प्रस्ताव वाचुन श्रंध्दांजली वाहणेत आली.

मा.श्री.शं.ह.घुले :- महाराष्ट्रातील नामांकित पहिलवान व महाराष्ट्र केसरी युवराज पाटील यांचे दु:खद निधन झाल्यामुळे दुखवटयाचा प्रस्ताव मांडला व पुढे म्हणाले. युवराज पाटील हे डबल महाराष्ट्र केसरी कोल्हापूर मोतीबाग तालिम येथील होते. त्यांचे दुर्देवाने अपघाती निधन झाले. महानगरपालिकेने घेतलेल्या महापौर केसरी कुस्ती स्पर्धेमध्येही त्यांनी हजेरी लावुन त्यांना मनपा तर्फे सत्कार करण्यांत आला होता. अशा नामांकित पहिलवानास महाराष्ट्र मुकलेला असल्याने व त्यांच्या अचानक निघुन गेल्या मुळे कुस्ती क्षेत्राचे फार नुकसान झालेले आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात मी सहभागी आहे. सर्वांच्या वतीने मी त्यांना भावपुर्ण श्रंध्दांजली वाहतो.

मा.श्री.अशोक कानडे :- नागापुरचे माजी सरपंच सदाशिव सप्रे यांच्या दु:खद निधनामुळे त्यांचाही दुखवटयाचा प्रस्ताव या सभेत घेण्यात यावा.

विषय क्रमांक : १ :- मागील सभेचे कार्यवृत्त वाचुन कायम करणे.

मा.श्री.दिप चव्हाण :- सिध्दार्थ नगर येथील अण्णाभाउ साठे वसाहतीची मा.आयुक्त साो, यांनी पहाणी केली आहे. याठिकाणचे बरेचशे प्रश्न मी यापुर्वीच मांडलेले आहेत. व माझ्या भागातील प्रश्न सुटण्याकरीता मी उपोषणाची नोटीसही प्रशासनाला दिली होती. तथापि प्रशासनाने माझ्या पत्राची दखलही घेतलेली नाही व मला त्याबाबत साधे उत्तरही पाठविलेले नाही. माझ्या पत्रावरुन नगरसेवकांनी पत्रे पाठविली याचे भान ठेवुन उत्तरे द्यावयास पाहिजे.

यावर उपमहापौर श्री.सुळ यांनी मा.नगरसेवकांची पत्रे आल्याबरोबर त्यास प्रशासनाने खुलासा करणे आवश्यक आहे असे सुचविले.

सभागृहामध्ये मा.सदस्य बोलण्यास उभे राहिले सर्व श्री.पाउलबुधे, दिप चव्हाण, अनंत जोशी, भगवान फुलसौंदर, नरेंद्र कुलकर्णी.

मा.महापौर सदर भागामध्ये डी.पी.रोड आहे. सदर भागातील शौचालय बांधकाम पाडलेच कसे गेले व कोणी पाडावयास सांगितले हा प्रश्न आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- सदरचा विषय शौचालय पाडण्याचा नाही तर सदर ठिकाणचे बांधकाम करण्या बाबतचा विषय आहे.

त्यावर मा.महापौर यांनी सागितले की, आयुक्त साो, यांनी सदर बाबत पहाणी केलेली आहेच तेच योग्य तो मार्ग काढु शकतील.

मा.श्री.गिरवले कैलास :- अशाच प्रकारे कोठी येथील कामाचा शुभारंभ झालेला होता. ते कामही चालू नाही.

मागील दिनांक १८/१२/२००७ च्या कार्यवृत्तावर चर्चा चालू झाली असता

१. शिक्षण मंडळ सदस्यांना मानधन भत्ता देणे बाबत

मा.श्री.सुळ दिपक उपमहापौर :- सदरचा विषय मागील वेळेस स्थगित ठेवणेंत आला होता. याबाबत उपायुक्त यांनी खुलासा करावा असे सुचविले.

यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, ब-याच महानगरपालिकेतुन या बाबतची माहिती मागविण्यांत आलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आपल्या शिक्षण मंडळाच्या सदस्यांना मानधन देत नाही. औरंगाबाद येथे शिक्षण मंडळ अस्तित्वात नाही. तसेच सांगली मिरज कुपवाड या महानगरपालिकेतही मानधन दिले जात नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- मागील वेळी हा विषय तहकुब होता.

महापौर :- मा.सदस्यांनी याबाबत आपले मत द्यावे. सदर विषय मांडायचा किंवा ठेवायचा.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सदर विषय घेण्यांत यावा असे सुचविले.

मा.श्री.दिप चव्हाण :- मागील सभेतील प्रस्ताव क्रमांक ७ श्रीखंडे कंन्सल्टंट यांच्या प्लॅनिंग बाबत कारवाई कोठपर्यंत केलेली आहे. बजेट केलेले आहे काय. अमरधाम चौक ते दिल्लीगेट ते पत्रकार वसाहत हा रस्ता पावणे दोन ते दोन कोटी रुपयांपर्यंत होवु शकतो. आता अंदाजपत्रक खुपच वाढलेले आहे.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, पुर्वी सदरचा रस्ता हा १ किलोमीटर लांबीचा धरलेला होता. त्यामध्ये हा रस्ता आता दोन किलोमीटर लांबीचा धरण्यांत आलेला आहे. व नविन संकल्पनेनुसार रस्ता चांगल्या प्रकारे होत असल्यामुळे या रस्त्याचे बजेट वाढलेले आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- याबाबतचे टेंडर तीन वेळा निघालेले आहे.

मा.महापौर यांनी रस्त्याबाबत परत खुलासाकेला की, बँकांकडुन अर्थसहाय्य घेवुन रस्ता करण्यांबाबत चर्चा चालू आहे. कमीत कमी व्याज दराने ज्या बँका कर्ज उपलब्ध करुन देतील त्यांच्याकडुन कर्ज घेण्यांत येईल ५ टक्के दराने कर्ज मिळाल्यास हरकत नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :-दलित वस्तीतील कामाचे रनिंग बिल देता येत नाही असे माझे मत आहे. (दलित वस्ती नागरी सुधारणा)

यावर प्रशासनाने कामाचे रनिंगबिल देण्यांत येते असा खुलासा केला.

मा.श्री.अशोक कानडे :- दि.१८/१२/२००७ च्या विषय क्रमांक २ मधील एकात्मीक घरकुल योजनेची मध्ये चर्चा केली.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, हडको केंद्रशासनाचे योजनेतुन महानगरपालिका करण्यांस तयार आहे.

मा.श्री.उडाणशिवे :- अ घोषित झोपडपट्या घोषित करणे बाबत महानगरपालिकेने काय कार्यवाही केली. याबाबतचा खुलासा देण्यात यावा अशी मागणी केली.

यावर श्री.धोंगडे नगररचनाकार यांनी खुलासा केला की, शासनाकडे झोपडपट्या घोषित करणे बाबत प्रस्ताव पाठविणेंत आलेला आहे. व त्यावर मा.महापौर यांनी पुन्हा शासनास स्मरणपत्र देण्यांत यावे असे आदेश दिले. व अशा प्रकारे झोपडपट्या घोषित झाल्यानंतर व जाहीर झ ााल्यानंतर कार्यवाही करता येईल.

मा.श्री.उडाणशिवे : यावर शासनास पुन्हा स्मरण पत्र पाठविण्यांत यावे असे सांगितले.

मा.श्री.कैलास गिरवले :- कनिष्ठ अभियंत्याच्या खुल्या जागेतील विशेष भरती बाबत श्री.सातपुते यांनी कोर्टाकडुन स्थगिती आदेश मिळविला आहे. याबाबत महानगरपालिकेची काय भुमिका आहे याबाबतचा खुलासाकरावा असे सुचविले.

यावर उपायुक्त यांनी याबाबतचा खुलासा केला.

मा.श्री.अभय आगरकर :- भरतीचे वेळी कॅवेट का दाखल करुन घेतले नाही. आस्थापना खर्च वाढतो आहे या मुद्यावर महानगरपालिकेच्या शेड्युल वरील सॅक्शन पोस्ट वाया घालवणार आहेत काय. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, दिनांक १ ऑगस्ट २००८ पासुन महाराष्ट्र शासनाचा जकात कर रद्द होणार असल्यामुळे व सदरची पदे ही बहुतांशी जकात विभागाकडील असल्याने याबाबत महाराष्ट्र शासनाकडुन मार्गदर्शन मागविण्यांत येईल व तद्‌नंतर सदर भरती बाबतची स्थगिती उठविण्यांत येईल.

मा.श्री.अशोक कानडे :- अनुशेष भरती बाबत मे.महाराष्ट्र शासनाकडील गाईड लाईन्स आहेत.

मा.श्री.अभय आगरकर :- अनुशेष भरती बाबत मा.आयुक्त यांनी केलेला खुलासा आम्हांस मान्य नाही. यामुळे आपण सामाजिक न्याय तत्वासच तिलांजली देत आहात. याबाबत मागील आयुक्त मा.पवार आणि आपल्या भुमिका वेगवेगळया आहेत याबाबतही आपण खुलासा

करावा. कुठल्याही घटकावर अन्याय होणार नाही हे पहावे व मा.आयुक्त यांनी याबाबत जो निर्णय घेतला आहे तो मागे घ्यावा. अनुशेष भरती बाबत मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस वेळोवेळी बैठका होत असतात व नेहमी चर्चाही होत असते. व तेथे अनुशेष भरण्याबाबत प्रोसिडींगही असते. सदरचे प्रोसिडींग सादर करावे सदर प्रोसिडींग आपण गुंडाळून ठेवणारआहात काय.

मा.श्री.कानडे अशोक : मा.आगरकर यांनी योग्य ती सूचना मांडलेली आहे. त्यामुळे मा.आयुक्त यांनी भरती बाबत स्थगिती दिली आहे ती त्यांनी मागे घ्यावी कारण अनुशेष हा विषय आणि एकुण खर्च हे विषय वेगवेगळे आहेत. यावर आयुक्त यांनी पुनःश्च खुलासा केला की, जकात बंद झाल्यावरही ही पदे रहाणार आहेत त्यामुळे त्याबाबत विचार करावा.

मा.श्री.अभय आगरकर :- मागील इंजिनिअर भरती बाबत सभागृहामध्ये जी चर्चा झ ाली ती कॅसेट वरील चर्चा पुसून टाकण्यात आली आहे. मी याबाबत सदरची कॅसेट देण्याबाबत मागणी केली होती ती कॅसेट मला मिळालेली नाही. अशा गोष्टीबाबत अधिकारी यांनी जबाबदारीने वागावे.

मा.श्री.कानडे अशोक :- अशा कॅसेट बाबत कारवाई झाली पाहीजे. या सर्व केलेल्या मागण्यांबाबत चौकशी करावी.

मा.श्री.कैलास गिरवले :- ही गंभीर स्वरुपाची घटना झालेली आहे. याबाबत काय काय कार्यवाही करण्यांत आली आहे याची तपासणी करण्यात यावी. यावर मा.महापौर यांनी चौकशी करावी व महासभेत अहवाल आला पाहिजे असे सांगितले. तसेच अनुशेष भरती होणे आवश्यक आहे. या बाबत आयुक्त यांनी १५ दिवसांत नियमानुसार मा.शासनाचे मार्गदर्शन घेण्यात येईल असे सांगितले.

मा.श्री.कैलास गिरवले :- तालिम मास्तर बाबतचा विषय उपस्थित करतांना सांगितले की, ते कर्मचारी तालमीत रहात नाहीत व फुकटचा पगार खातात. गार्डन विभागातील अनेक कर्मचारी इतर विभागात काम करीत आहेत. संबंधित अधिकारी हे कर्मचा-यांना पाठीशी घालतात.

मा.श्री.सुळ उपमहापौर : गार्डन विभागातील सर्व कर्मचारी हे बांधकाम विभागाचे अंडर देण्यांत यावे.

मा.श्री.अभय आगरकर : मागील प्रोसिडींग कायम करण्याकरीता आज जवळ जवळ ६ महिन्यानंतर सभेपुढे येत आहे. यापुढील काळात किमान १ महिन्यालगतच्या सभेपुढे कार्यवृत्तांत कायम करण्यांस घेण्यांत यावा. तसेच पर्यावरण दिन साजरा करणे साठी जो खर्च झालेला आहे. याबाबत काही दखल घेतली आहे किंवा नाही. पर्यावरणाचा खर्च कागदोपत्री दाखविला गेला आहे वस्तुतः झालेला नाही. महानगरपालिके मार्फत खाजगी करणातुन कुत्र्यांचे निर्बिजीकरण होत आहे यात मोठया प्रमाणावर आर्थिक घोटाळा होत आहे. त्याबाबत पायबंध घालणार किंवा नाही.

मा.महापौर :- सर्व अधिकारी यांना सूचना दिल्या की, महासभेची ज्या ज्या वेळी मिटींग असेल व सभेपुढे जे जे विषय ठेवले असतील त्यात आप-आपल्या खात्याकडील अद्यावत माहिती घेवुनच सभेपुढे यावे. व वरील प्रकरणा बाबत उपायुक्त श्री.जावळे यांची चौकशी समिती नेमण्यांत येवुन व माहितीची चौकशी करुन पुढील सभेला माहिती द्यावी किंवा संबंधित सभासदांना माहिती द्यावी असे सांगितले व गार्डन विभागाकडील सर्व कर्मचारी बांधकाम विभागाच्या अंतर्गत वर्ग करावे असे सुचविले. यावर आयुक्त यांनी पर्यावरण अहवालाबाबत चौकशी उपायुक्त व मुख्यलेखापरिक्षक यांनी करुन १५ दिवसांत अहवाल सादर करावा असे सांगितले.

मा.महापौर :- महासभेपुढे घेतलेल्या सर्व निर्णयाची अंमलबजावणी झाली किंवा नाही याची पहाणी करुन वेळोवेळी अहवाल सादर करीत जावा.

मा.श्री.अभय आगरकर :- दि.१८/१२/२००७ च्या सभेचे कार्यवृत्त कायम करीत असतांना मी बजेटच्या विषया बाबत बजेट मॉनिटरींग कमिटी स्थापन केली पाहिजे असे सुचविलेले होते. त्यामुळे निरनिराळी कामे प्रस्तावित करतांना संबंधित किती खर्च झाला याचा रिव्ह्यु घेता येत नाही.

किमान अधिकारी पातळीवर तरी अशा प्रकारे रिव्ह्यु घेण्यांत यावा. २ ते ३ महिन्यापुर्वीच मी या बाबत सूचना केलेली होती.

माळीवाडा येथे पुर्वी भाजी मार्केट होते तथापि भाजी विक्रेत्या करीता जागा राहिलेली नाही. सध्याचे गॅरेज संबंधित जागेस पर्याय म्हणुन घेण्यात यावे. भाजी मार्केट साठी व्यवस्था करावी. खोकरनाला अंदाजपत्रका बाबत नोंद करुन घ्यावी.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, नालेगांव गाडगीळ पटांगण येथील मोकळया जागेचा वापर होत नाही व सदर ठिकाणी भाजी मार्केट शक्य आहे का ? खुली जागा वापरास हरकत नाही.

यावर नगररचनाकार यांनी खुलासा केला की, सदर जागा ही खेळाच्या मैदानाकरीता वापरात आहे.

मा.श्री.वाकळे :- सावेडी येथील मोकळया जागे बाबत काय कार्यवाही करण्यांत आली याची माहिती देण्यात यावी.

मा.श्री.अनंत जोशी :- मागील तीन सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास ठेवण्यात आलेले आहे. आम्ही वेळोवेळी प्रश्न कोणास विचारावे गेल्या दीड वर्षात प्रश्नांची उत्तरे नाहीत. बांधकाम आरोग्य विभागाकडुन उत्तरे मिळत नाहीत. मा.महापौर यांनी आदेश देवुनही त्यांचे आदेशाची पायमल्ली होत असेल तर आम्ही कुठल्या सभेत प्रश्न विचारायचे आहेत. व प्रश्नउत्तरे दिली नाहीत याबाबत अधिका-यांना खुलासा विचारणार किंवानाही याचा खुलासा करावा.

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- महानगरपालिकेने उपविभागीय कार्यालये कार्यरत केली आहेत. तथापि या उपकार्यालयामध्ये आरोग्य करवसुली व इतर कर्मचारी उपस्थित नाहीत.

यावर मा.महापौर यांनी झोन कार्यालयामध्ये कर्मचा-यांची व सक्षम अधिका-यांची नेमणूक करण्यांत यावी असे सांगितले.

मा.श्री.दिप चव्हाण :- दि.२७/१२/२००७ चे सभेमधील विषय क्रमांक ७ बाबत कमिटी नेमण्यात आली होती याबाबत अहवाल आला आहे काय अशी विचारणा केली.

मा.श्री.सुनिल कोतकर :- क्रीडा संकुल उभारणे बाबत बजेट मध्ये विषय समाविष्ट करावा. त्याबाबत स्वतंत्र पत्र देण्यांत येईल असे सांगितले.

मा.श्री.अशोक कानडे :- दलित वस्त्यांचे कामकाजा बाबत झालेल्या रनिंग बिले देण्यांत आली आहेत याबाबत शहर अभियंता यांनी खुलासा करावा अशी मागणी केली.

याबाबत मा.महापौर यांनी जी.आर.नुसार अशी रनिंग बिले देता येतात असा खुलासा केला.

विषय क्रमांक : ३ :- स्नेहालय व रुरल डेव्हलपमेंट रिसर्च ॲण्ड कम्युनिकेशन या संस्थेकरीता जागा देणे बाबत...

मा.श्री.अशोक कानडे :- सदरचा विषय मंजूर करावा.

मा.श्री.कृ.द.जाधव :- सदर संस्थेला जागेची आवश्यकता आहे. जागेचा प्रश्न आपण सोडवू शकतो याबाबत महानगरपालिका संस्थांचेही वर्ग चालवित आहे. मा.महापौर यांनी सदरचा विषय मंजूर करावा असे सांगितले.

मा.श्री.कैलास गिरवले :- यापुर्वी स्नेहालय या संस्थेस शाळा क्रमांक १४ च्या दोन खोल्या दिलेल्या आहेतच या ठिकाणी ते उपक्रम चालू शकतात. संस्था महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देणार आहे असे सांगितले. तर मग महानगरपालिकेच्या रेल्वेस्टेशन सावेडी, इत्यादी लांबचे विद्यार्थी याठिकाणी प्रशिक्षणास येवू शकणार आहेत काय सदर संस्था महानगरपालिकेच्या शाळेत तेथे जावून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण का देत नाही. सदर संस्थेच्या कार्याबद्दल आम्हाला आदर आहेच याठिकाणच्या जागेत महानगरपालिका स्वत:च्या इंग्रजी

माध्यमाच्या शाळा का चालवत नाही. शिक्षण मंडळाकडील गेल्या १० वर्षापासुन चुकीच्या पध्दतीने दिल्या गेलेल्या ब-याचशा शाळा खोल्यांचे जागा भाडे वसुली बाबत मा.श्री.भाउसाहेब जाधव, सदस्य यांनी वारंवार सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केले आहेत. व अशा प्रकारे ५० लाख रुपयांच्या थकबाकी बाबतचा आवाजही उठविलेला आहे. सदरची थकबाकी महानगरपालिकेला अजून मिळालेली नाही. त्यामुळे एवढी मोठी शाळा सदर संस्थेला कशाकरीता द्यावयाची.

मा.श्री.शं.ह.घुले :- झोपडपट्टीतील तसेच दुर्बल घटकातील मुला-मुलींना संगणक शिक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून स्नेहालय संस्थेने जागेची मागणी केलेली आहे. ब-याचशा शाळा यापुर्वी महानगरपालिकेने संस्थांना दिलेल्या आहेत.

यावर श्री.गुळवे प्रशासनाधिकारी नगरपालिका शिक्षण मंडळ, विविध संस्थांना दिलेल्या शाळा खोल्यांच्या बाबतीत खुलासा सादर केला यावर मा.महापौर यांनी प्रशासनाधिकारी यांना शिक्षण मंडळाकडील नाईटवॉचमन यांच्याकडे असलेल्या खोल्याबाबतही काय कार्यवाही केली याबाबत विचारणा केली. कर्मचा-यांवरही कारवाई करावी व त्यांचेकडुन वसुली करावी.

मा.श्री.कैलास गिरवले :- सदर बाबतचा विषय गंभीर स्वरुपाचा आहे. इंग्रजी माध्यमाची शाळा महानगरपालिका चालवू शकते याबाबत मला जागा संस्थेला देण्याबाबत ब-याच जणांचे फोन आले परंतु मी कोणाच्याही दबावाला भिक घालत नाही. सदर जागा कोणासही देण्यात येवू नये असे माझे स्पष्ट मत आहे.

मा.श्री.संजय चोपडा :- सदर संस्थेचे काम चांगले आहे. सदर संस्थेस जागा देण्यांत यावी.

मा.श्री.नितीन जगताप :- स्नेहालय या संस्थेचे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये चांगले काम आहे. महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने सदर संस्थेस मदत करावी मात्र जागा देण्यात येवू नये.

मा.श्री.शं.ह.घुले :- शिक्षण मंडळाच्या शाळांमधील ब-याचशा खोल्या संस्थांना दिल्या गेल्यामुळे ४३ लाख रुपये भाडे थकीत आहे. त्यामुळे त्याकरीता स्पेशन बोर्ड बोलावुन कायदेशिर कारवाई करावी व जागा ताब्यात घेण्यांत याव्यात. तथापि स्नेहालय ही संस्था बरेच सामाजिक कार्य उदा-एडस् महिला आणि मुलांचे कल्याण इ.कार्य करीत आहे. तसेच त्यांच्याकडे पुर्वी असलेल्या खोल्यांचे भाडेही त्यांनी भरले आहे. सदर संस्थेला मोठ्या अभिमानाने जागा द्यावी.

मा.श्री.मिलींद गंधे :- सन १९९५ मध्ये सदर संस्थेने ही जागा मागितली होती. पुर्वीच जर ह्या संस्थेला जागा दिली असती तर गोरगरीब विद्यार्थ्यांची ते सोय करु शकले व इतर शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण घेवू शकले असते. तरी सुध्दा जागा देणे बाबत ठराव मंजूर करण्यांत यावा. तसेच या संस्थेच्या कार्यकारिणीवर मा.महापौर व मा.आयुक्त यांचे प्रतिनिधी नेमावेत.

मा.श्री.त्रिपाठी :- सामाजिक संस्थेस महानगरपालिकेने मदत करणे आवश्यक आहे. थकबाकी वसुली बाबत मा.महापौर यांनी उपायुक्त (कर) यांना उत्तरे द्यावीत असे सुचविले. यावर उपायुक्त यांनी शाळा खोल्या ताब्यात असलेल्या संबंधित संस्थांकडून नियमानुसार कारवाई करुन भाडे वसुल करण्यांत येईल.

मा.श्री.सुळ दिपक उपमहापौर :- यापुर्वी तीन चार सभेमध्ये ब-याच वेळा प्रॉपर्टी बाबत चर्चा झाली आहे. महानगरपालिकेमध्ये पॉपर्टीच्या नोंदी घेणेकरीता प्रॉपर्टी इनचार्ज नाही. त्यामुळे सर्व नांवे लावणे, जागा मिळविणे, याबाबत कारवाई करावी आणि आढावा घेण्यात यावा.

मा.श्री.त्रिपाठी :- वेळोवेळी सभेमध्ये चर्चा होते परंतु बोर्ड संपल्यानंतर त्यावर कारवाई केली जात नाही.

मा.श्री.गारुडकर अंबादास :- शिक्षण मंडळाच्या अनेक संस्थांना दिलेल्या जागांबाबत चर्चा चालू आहे. या जागा ज्या संस्थांना दिल्या आहेत त्यामध्ये स्नेहालय संस्था उपेक्षितांसाठी चांगले काम जिल्हयामध्ये करीत आहे. त्यांना जागा देण्यात यावी.

मा.श्री.अशोक कानडे :- विविध संस्थांना जागा दिलेल्या आहेत. तसेच स्नेहालयावर अन्याय होत आहे. या विषयाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. जो घटक शिक्षणापासुन वंचित आहे अशा घटका करीता चाईल्ड लाईन या करीता जागा दिली पाहिजे.

मा.महापौर :- ज्या ज्या संस्थांना जागा यापुर्वी दिलेल्या आहेत त्याबाबतचा अहवाल पुर्ण करुन पुढील सभेपर्यंत सादर करावा असे आदेश दिले.

मा.श्री.अशोक कानडे :- तरी स्नेहालय संस्थेला जागा देण्यात यावी.

मा.श्री.उडाणशिवे :- सदर संस्था ही झोपडपट्टयातील मुलांना तेथे येवुन शिक्षण देणार आहे काय. झोपडपट्टीतील समाज मंदिर त्यांच्याकडुन वापरले जात आहे. त्याठिकाणी संगणक शिक्षणाची सोय होवू शकेल परंतु ते न करता इतर शाळांमध्ये ती सोय करीत आहे. समाज मंदिर त्यामुळे प्रत्यक्ष समाजातील लोकांना वापरावयास मिळत नाही. याबाबतही चौकशी करण्यात यावी.

मा.श्री.अभय आगरकर :- स्नेहालय रुरल डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च कम्युनिकेशन सेंटर व महानगरपालिका यांच्या जॉईंट व्हेंचरने मनपा शाळेतील गरीब गरजू विद्यार्थ्यांना संगणकीय प्रशिक्षण ही संस्था देणार आहे. तसेच या संस्थेचे काम अनेक वर्षापासुन चालू आहे. शिक्षण मंडळामार्फतही स्पर्धा परिक्षा, आदर्श शिक्षण मंडळ व त्यांचेकडील प्रकल्प राष्ट्रीय पारितोषिका साठी शिफारस होत आहे. ही शिक्षण मंडळाची उद्दीष्टये आहेत. त्याचप्रमाणे स्नेहालय ही संस्था गरीब गरजू घटकांसाठी काम करीत असल्याने त्या संस्थेला जागा देण्यांत यावी.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, स्नेहालय ही चांगले सामाजिक काम करणारी संस्था आहे. शिक्षण मंडळाकडुनही विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत चांगले काम होत आहे. शिष्यवृत्ती परिक्षा, स्पर्धापरिक्षा केंद्र , अपंग समावेशित शिक्षण केंद्र इ. राष्ट्रपती पारितोषिकासाठी जाणार आहे. महानगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रमुखही चांगले काम करीत आहेत. त्यामुळे अशा कामाकरीता महानगरपालिका शाळेस जागा देणे इष्ट होईल.

विषय क्रमांक : ४ :- विना अनुदान तत्वावर दोन माध्यमिक शाळा चालू करणे बाबत.

मा.श्री.अनंत जोशी :- महानगरपालिका शिक्षण मंडळामार्फत कायम विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी प्रस्ताव सादर झालेला आहे. यामध्ये कार्यालयीन प्रस्तावामधील पॅरा क्रमांक १ व पॅरा क्रमांक २ एकमेकांशी विसंगत आहेत. त्याचप्रमाणे याबाबतची आणखी एक टिप्पणी मिळालेली आहे. कायम विना अनुदान तत्वावर वर्ग चालविण्या करीता १५ लाख रुपयांचा खर्च येणार आहे. याकरीता किती शिक्षक आवश्यक आहेत. त्यासाठी प्रत्यक्षात किती खर्च येणार आहे. यावर महानगरपालिकेचा होणारा खर्च अयोग्य आहे. शिक्षण मंडळाकडे फक्त प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी आहे. माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी नाही. त्यामुळे माझा यास विरोध आहे.

मा.श्री.शं.ह.घुले :- महानगरपालिकेच्या शाळेमध्ये आर्थिकदृष्टया गोरगरीब नागरिकांची मुले शिक्षण घेत असतात. सर्वांसाठी शिक्षण ही जबाबदारी आहे. अशाच प्रकारे इतर काही महानगरपालिकांनी माध्यमिक शाळा सुरु केलेल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांकरीता माध्यमिक शाळा वर्ग चालू करणे. हा विषय मंजूर करावा अशी विनंती केली.

मा.श्री.अशोक कानडे :-माध्यमिक शाळा चालू करण्यासाठी वर्ग चालू करावा.

यावर आयुक्त यांनी खुलासा केला की, शिक्षण पध्दती बाबत सविस्तर चर्चा केलेली आहे. माध्यमिक वर्गासाठी माध्यमिक शिक्षण विभाग करावा लागेल. तसेच नियमानुसार आठवीच्या वर्गांकरीता पदवीधर व बी.एड. पात्रता असणारे शिक्षण नेमावे लागतील. तो खर्च महानगरपालिकेला करावा लागेल.

मा.श्री.अनंत जोशी :- महानगरपालिका शिक्षण मंडळाकडे सध्या अतिरिक्त शिक्षक आहेत काय. याबाबत खुलासा करावा.

यावर प्रशासनाधिकारी गुळवे यांनी अतिरिक्त शिक्षक नसल्याचा खुलासा केला.

मा.श्री.अनंत जोशी :- तथापि महानगरपालिकेच्या शाळेतील पटावर विद्यार्थ्यांची संख्या खोटी लिहीली जाते. प्रत्यक्षात विद्यार्थी नसतात असे अनंत जोशी यांनी सांगितले त्यामुळे सभागृहाची दिशाभुल होत आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न कमी होत असतांना अशा प्रकारे माध्यमिक शिक्षणाचा महानगरपालिकेने वाढविणे योग्य नाही. त्यास माझा विरोध आहे.

मा.श्री.शं.ह.घुले, मा.श्री.अभय आगरकर :- विषय कशा प्रकारे घेण्यांत आलेला आहे.

प्रशासनाधिकारी श्री.गुळवे यांनी खुलासा केला की, माध्यमिक शिक्षण हे प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अखत्यारीत नाही. हा वेगळा विभाग आहे.

त्यावर शं.ह.घुले यांनी सांगितले की, शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. त्यामुळे शिक्षण देणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. पिंपरी चिंचवड हे अशा प्रकारे शिक्षण विभाग राबवित असेल तर अहमदनगर महानगरपालिकेला चालू करणे शक्य आहे. इतर महापालिकाही अशा प्रकारे चालवित असतील तर याबाबतचा विचार करावा. मनपातील विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारे डोनेशन द्यावे लागत नाही.

महापौर :- महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आपण सुरुवातीला फक्त दोन वर्ग मंजूर करु असे सांगितले.

मा.श्री.अभय आगरकर :- महानगरपालिकेची प्राथमिक शिक्षण सेवा सुविधा सुरुवातीस चांगली ठेवावी. माध्यमिक शिक्षण चालविण्यासाठी महानगरपालिका शिक्षण प्रशासनाधिकारी यांचे कायदेशिर नियंत्रण नाही. त्यामुळे याबाबतीत माध्यमिक शिक्षण वर्गाचा आस्थापना खर्च वाढणार असुन इतर महानगरपालिकेकडे शाळा अनुदान तत्वावर असुन दि.३०/१२/१९९८ च्या जी.आर.प्रमाणे संस्थांना अनुदान मिळणार नाही. माध्यमिक शिक्षण विभाग स्वत: चालवुन खर्च सोसावा लागणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेने प्रथम प्राथमिक शिक्षण सुधारावे माध्यमिक शिक्षण सुरु करण्यास आमचा विरोध आहे.

यावर आयुक्त यांनी खुलासा केला की, माध्यमिक शिक्षणाचे वर्ग चालू करावे लागल्यास त्यास बी.एड., एम.एड.शिक्षक घ्यावे लागतील सध्याचे सर्व शिक्षा अभियानामधील बी.एस.सी.बी.एड., एम.पी.एड. इत्यादी शिक्षक चालवु शकणार नाहीत. तसेच प्रशासनाधिकारी यांनी सर्व शिक्षा अभियानातील शिक्षक माध्यमिक शिक्षणाकडे वापरता येणार नाही.

यावर पाउलबुधे यांनी मात्र मंजूर करावे असे सुचविले.

मा.श्री.अभय आगरकर :- या बाबत भुमिका स्पष्ट करतो की, महानगरपालिकेने अशा प्रकारे उपक्रम चालवू नये असे आमचे म्हणणे नाही. चांगल्या गोष्टी करीता आमचा विरोध असण्याचे कोणतेही कारण नाही. प्राथमिक शिक्षण चांगल्या प्रकारे दत असाल तरच पुढे माध्यमिक शिक्षण होवू शकेल. त्यामुळे अगोदर प्राथमिक शिक्षण सक्षम करणे जरुरीचे आहे. यामध्ये माध्यमिक शिक्षण विभागावर सध्याचे प्राथमिक शिक्षणाचे शिक्षणाधिकारी यांचे कायदेशिर नियंत्रण रहाणार आहे काय ?

त्यावर प्रशासनाधिकारी गुळवे यांनी काम करता येणार नाही असे नमुद केले.

मा.श्री.आगरकर :- पुढे सांगितले की, आस्थापना खर्च वाढणार असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका या ठिकाणी ५० - ५० वर्षापासुन महानगरपालिका आहे. तसेच दि.३०/१२/१९९८ जी.आर.चा निर्देश पाहता आपले महानगरपालिकेस याबाबत अनुदान दिले जाणार नाही. त्यामुळे यास आमचा विरोध आहे.

मा.श्री.कृ.द. जाधव :- महानगरपालिकेतील शाळांचा दर्जा उंचावलेला आहे. खालच्या पातळीचा विचार करता यापुढे आठवीचे वर्ग चालू करावेत असे सुचविले. व मानसिकता वाढवावी.

महानगरपालिकेच्या जलविहारास ५० वर्ष पुर्ण झालेली असल्याने तेथील जलपुजनाचा कार्यक्रम मंजूर करावा अशी विनंती केली.

विषय क्रमांक : ५ :- बुरुडगांव येथील भाजीमार्केट बाबत.

मा.श्री.नितीन जगताप :- सन १९९२ पासुन सदर भाजी मार्केट अर्धवट अवस्थेत आहे. आजुबाजूची परिस्थिती अत्यंत खराब व घाण झालेली आहे. याबाबत मी मनपाला दोन पत्रे दिलेली आहे. सदर ठिकाणी बी.ओ.टी.तत्वावर भाजी मार्केट, गाळे व छोटेशे सभागृहही बांधावे. सदर जागा भाजी मार्केट साठी आरक्षीत आहे. सदर ठिकाणी खाली भाजी मार्केट व वरती सभागृह करणेस हरकत नाही. तसेच सदर ठिकाणचा चौकही सुशोभिकरण बी.ओ.टी. तत्वावर करणे बाबत मंजूरी देवुन विषय मार्गी लावावा व हा विषय सभेपुढे घेतल्या बद्दल आभार मानतो.

यावर महापौर यांनी खुलासा केला की, सदरचे काम बी.ओ.टी तत्वावर होणार आहे.

मा.श्री.त्रिपाठी :- आत्ताच श्री.जगताप यांनी जी सूचना मांडली ती योग्यच आहे. १५ वर्षापासुन या जागेचा कुठलाही वापर नसुन कचराकुंडी झालेली आहे. यामधुन महानगरपालिकेला उत्पन्न मिळू शकले असते. तरी हा विषय मार्गी लावावा हि विनंती.

मा.श्री.शिंदे :- भाजी मार्केटचा विषय बी.ओ.टी. वर घेतलेला आहे. त्याप्रपमाणे सदरच्या ठिकाणचा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे तोही करावा. तसेच चौकामध्ये इलेक्ट्रीक पोल अडथळा असल्यामुळे इलेक्ट्रीक पोल हलविण्यांत यावे व कार्यवाही त्वरीत व्हावी.

मा.श्री.चोपडा :- हा एक चांगला विषय भाजीमार्केटचा आणल्याबद्दल अभिनंदन करतो.

मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी :- सावेडी भाजी मार्केट बाबतही पुढील कार्यवाही करण्यांत यावी याबाबतचे उत्पन्न बुडत आहे.

याबाबत मा.महापौर यांनी दोन दिवसांत निविदा मागवुन कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

विषय क्रमांक : ६ :- घनकचरा व्यवस्थापन

मा.श्री.दिप चव्हाण :- हा विषय सभागृहापुढे येवू शकत नाही. विषय का आणण्यांत आलेला आहे. ४ महिन्यापुर्वी स्थायी समितीत ठराव झाला आहे. आता हा ठराव कशासाठी आलेला आहे.

यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, करारनामा, ठराव, मा.सदस्यांचा विरोध इत्यादी प्रश्नावर मा.आयुक्त सो, यांचेकडे ठेवला असता त्यांचे सूचनेप्रमाणे मा.सभेपुढे साधक-बाधक चर्चेसाठी ठेवण्यांत आलेला आहे.

मा.महापौर :- डी.पी.आर मंजूर असल्याने शासन अनुदान देण्यार नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- ३० वर्षाचा करार करण्याचा अधिकार आहे काय ? प्रशासनाने केलेली ही चूक आहे. वर्क ऑर्डर का देण्यांत आलेली नाही.

परंतु महासभेपुढे प्रस्ताव व्हावा असे सांगितलेवरुन वर्क ऑर्डर दिलेली नाही. असा खुलासा करण्यांत आला असता अशा प्रकारे जबाबदारी महासभेवर ढकलण्याचा विचार आहे. व हा आयुक्तांचा अधिकार आहे.

डी.पी.आर.मंजूर झालेला असल्यामुळे ऑफिसरिपोर्ट महानगरपालिका देवू शकत नाही.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, डी.पी.आर.शासनाने मंजूर केलेला आहे. यावर अनुदान मिळणार नाही. सभागृहा पुढे हा विषय आणण्याची आवश्यकता होती काय.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी नाही असे सांगितले. व यास ४ महिन्यांचा कालावधी झालेला आहे. १ महिन्यांत निविदा रद्द होवू शकते.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, याला सभागृहाची काय मंजूरी पाहिजे. याबाबतीत करारनामा संपूर्ण झालेला आहे. वर्क ऑर्डर दिलेली नाही. या सभेपुढे हा विषय येण्याचे कारण नाही. १ महिन्यानंतर वर्क ऑर्डर देण्याची जबाबदारी आहे ती दिलेली आहे काय.

यावर मा.उपायुक्त यांनी सागितले की, सदरची कार्यवाही मा.आयुक्त यांचे निर्देशानुसार झ ालेली आहे.

उपमहापौर श्री.सुळ :- बी.ओ.टी. तत्वावर केल्यामुळे अनुदान देणे शक्य होणार नाही. मा.आयुक्त यांना अटी शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार आहे.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, सेक्शन ५३ प्रमाणे त्यांनाच अधिकार आहेत.

आयुक्त यांनी सांगितले की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) नुसार आयुक्तांस महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिका मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, भाडयाने देता येईल त्यास महानगरपालिकेची मंजूरी आवश्यक आहे.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, यांचा कालावधी कोणी ठरविला आहे. ३० वर्षाच्या कालावधीने देण्याचा अधिकार दिला आहे काय ? तेंव्हा सदरचा नविन विषय आणावा व कलम ७९ चे तरतुदी प्रमाणे कार्यवाही करावी. व याबाबतची जबाबदारी निश्‍चित करावी. अन्यथा आमचा विरोध राहील.

मा.श्री.कैलास गिरवले :- वेळोवेळी अटी बदलत गेल्या. अटी शर्ती बदलण्यासाठी स्थायी समितीने विषय महानगरपालिका सभेसमोर का आला नाही. यासाठी सभेने मंजूरी दिलेली होती. दरवर्षी दीड कोटी अनुदान प्राप्त होते. ३० वर्षाच्या प्रकल्पास ४५ कोटी महानगरपालिकेचे नुकसान आहे. सर्व खर्च संस्था करणार आहे. प्रशासन काय विचार करते याबाबत छाननी समितीचे निर्णयानुसार प्रशासन जबाबदार कोणतेही अनुदान मिळणार नाही. ही दुरुस्ती रद्द करावी व आयुक्त यांना अधिकार देण्यांत यावेत.

मा.श्री.अशोक कानडे :- घनकचरा खत निर्मिती प्रकल्प संदर्भामध्ये आयुक्त यांनी अभ्यास केला असेल तर विषय चुकीचा झाला असे मान्य आहे काय ? याबाबत आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात योग्य तो निर्णय घ्यावा असा ठराव करावा.

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- सभागृहापुढे विषय आलेला आहे. तो विषय मार्गी लावावा अशी विनंती करतो.

मा.श्री.अभय आगरकर :- सदरचा दस्तऐवज एकांकी झालेला आहे. तो सभागृहास बदलण्याचा अधिकार आहे किंवा नाही ? बदल करण्याचा अधिकार महासभेचा आहे. लिगल ॲग्रीमेंट व्हॉयलेट करता येईल काय हा निर्णय आयुक्त यांनी करावा. जाचक अटी काढुन घेवून या बाबतचा कालावधी १५ वर्षापर्यंतचा करावा.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, कालावधी ३० वर्षांचा करावा. फक्त अनुदान द्यावयाचे नाही. अनुक्रम नं.२१ अनुदान रद्द करावे. या करीता जामिन बँक गॅरंटी महानगरपालिका देणार नाही. या अटीवर आयुक्त यांनी पुढील कार्यवाही करावी.

विषय क्रमांक : ७ :- ड्रायव्हर नेमणे बाबत...

सुरुवातीस मेस्को मार्फत वाहन चालक नेमणे बाबत कंपनीचे अधिकारी यांनी माहिती व खुलासा केला. यासाठी एक्स सर्व्हीस मन आम्ही ड्रायव्हर म्हणुन लावतो व त्यांना ८ तास ड्युटी देतो असे सांगितले व त्यामध्ये आमच्या संस्थेमार्फत १४ टक्के कमिशन घेण्यांत येते असे

सांगितले. यावर अनंत जोशी नगरसेवक यांनी सांगितले की, इतर संस्था सदरचे काम ५ टक्क्यांपर्यंत करतात.

मा.श्री.दिप चव्हाण :- महानगरपालिकेकडे निरनिराळया खात्याकडे चौकशी करुन ड्रायव्हरच्या किती जागा रिक्त आहेत ते पहावे. सदर कंपनीच्या अटी आणि शर्ती महानगरपालिकेला परवडतील काय ? यासाठी ७० ते ८० लाख रुपये खर्च करावयाचा आहे.

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- महानगरपालिके मध्ये काही बिगारी ड्रायव्हरचे काम करण्यांस तयार आहेत. अशा लोकांना यामध्ये संधी देण्यांत यावी असे सुचविले.

मा.श्री.मिलींद गंधे :- प्रस्ताव चांगला आहे.

मा.श्री.जोशी :- स्वच्छ शहर सुंदर शहर या करीता आम्ही या योजनेचे स्वागत करतो. या करीता खाजगी करण होत आहे तथापि कमीत कमी पगारावर किंवा मानधनावर ड्रायव्हर घ्यावे. देखभाल खर्च खाजगी संस्थेने करावा.

यावर आयुक्त यांनी सांगितले की, शहरातील जुना भाग खाजगी करणातुन काम करुन घेतल्यास मोठे काम चांगले होईल.

यावर मा.श्री.गंधे यांनी उपनगरातील कचरा संकलना करीता कॉन्ट्रॅक्ट देण्यांत यावे.

मा.श्री.शेख मुदस्सर :- ड्रायव्हर एजन्सी नेमन्यामध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच महानगरपालिके मधील कर्मचा-यांची पदोन्नती त्वरीत देण्यांत यावी.

यावर ८ दिवसांत निर्णय घेण्यांत येईल असे आयुक्त यांनी सांगितले.

मा.श्री.उडाणशिवे :- कचरा संकलन करण्यासाठी महानगरपालिकेने गाडया आणलेल्या आहेतच घरोघर कचरा गोळा करण्याचे काम आमच्या संघटने मार्फत चार वर्षापासुन करण्यांत येत आहे. आमचा अधिकार संपुष्टात येईल. आमच्या संघटनेतील ब-याच कामगारांनी सुवर्ण जयंती रोजगार योजनेतुन ड्रायव्हरचे ट्रेनिंग घेतले आहे. त्यामुळे नविन आलेल्या वाहनांवर आमच्या संघटनेतील कर्मचा-यांना काम दिल्यास आम्ही निम्म्या पैशामध्ये काम करण्यात तयार आहोत. यावर सहानुभूतीपुर्वक आमचा विचार करावा.

मा.श्री.मिलींद गंधे :- महानगरपालिकेने वाहने विकत घेतल्यामुळे कचरा संकलन आणि वाहतुक यामध्ये टेंडरची रक्कम कमी होवू शकते.

मा.महापौर :- खरेतर महानगरपालिकेने अशा प्रकारे गाड्या वाहने घ्यावयास नको होती परंतु आता घेतलेली आहेतच तेंव्हा या गाडयांचा वापर करुन टेंडर कॉल करु शकतो.

मा.श्री.अभय आगरकर :- मा.महापौर आपण आयुक्त व उपायुक्त या बाबतीत ५ ते ६ जणांची कमिटी करुन डिक्सशन करुन पर्याय ठेवावे व मार्ग काढावा.

यावर उपमहापौर सुळ यांनी सांगितले की, ड्रायव्हर भरती करणे हाच पर्याय आहे.

मा.श्री.आगरकर :- गाडया चालविण्या बाबत विचार करावा. अधिकारी व इंजिनियर यांचेबरोबर चर्चा करावी व सदरचा प्रश्न मा.आयुक्त सो, यांचेकडेस सोपवावा व त्यांनी महानगरपालिकेच्या हिताचा निर्णय घ्यावा. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत.

यावर उपमहापौर यांनी आयुक्तांनी निर्णय घ्यावा असे सांगितले.

विषय क्रमांक : ८ :- प्रारुप विकास योजना मंजूरी बाबत...

मा.श्री.अनंत जोशी :- याबाबत आम्ही प्रशासनास यापुर्वीच पत्र दिलेले आहे. ते पत्र सभागृहात दाखविले. याबाबतीत मा.सदस्यांना पुरेसा वेळ मिळालेला नसल्यामुळे १५ दिवसाच्या नंतर पुढे याबाबत सभा आयोजित करावी असे सांगितले. यावर मा.श्री.गिरवले यांनी सदर विषयास अनुमोदन दिले.

मा.श्री.कृ.द. जाधव :- शहराचा विकास आराखड्यामुळे शहराच्या विकासाला चालना मिळालेली आहे. या विषया बाबतची टिप्पणी अभ्यासाकरीता १५ दिवसांनी सभा घेण्यांत यावी. तोपर्यंत या विषया बाबतची सर्व माहिती नगररचना विभागाने सर्व सदस्यांना झेरॉक्स करुन देण्याची व्यवस्था करावी.

शहरामध्ये एरोबिक्सच्या स्पर्धा भरविल्या जाणार आहेत त्याकरीता अहमदनगर महानगरपालिकेने या स्पर्धा आयोजना करीता स्पर्धा समितीला भरघोस अनुदान द्यावे व निधी द्यावा असे सभेचे वेळी सुचविले.

..........................................................................

ऑफिस रिपोर्ट व साधक - बाधक झालेल्या चर्चेनुसार ठरविण्यात येते की, सदर प्रकल्पाचा कालावधी ३० वर्षापर्यंत असावा.महानगरपालिकेने बँक गॅरंटी अथवा कुठलीही जामिन याची जबाबदारी घेवु नये तसेच मा.शासनाचे डि.पी.आर.प्रकल्पास मंजुरी दिल्यानुसार सदर प्रकरणा बाबत कार्यवाही करावी. ती कार्यवाही मा.आयुक्त यांनी करावी.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

दिनांक २५-०६-२००८ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील दुखवटयाच्या प्रस्तावांची यादी.